सरकारने अर्थव्यवस्थेचे अजून एक क्षेत्र विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या गुंतवणुकीसाठी खुले करण्याचा निर्णय घेतला आहे, ते म्हणजे किरकोळ व्यापार क्षेत्र. त्यांचा दावा आहे की त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होईलव ग्राहकांना वस्तू कमी किंमतीत मिळतील. शिवाय तीन वर्षात एक कोटी रोजगार निर्माण होतील. ते धडधडीत खोटे बोलत आहेत.

- विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्या महाकाय आहेत. एकट्या वॉलमार्टची विक्री भारतातीलएकूण १.५ कोटी किरकोळ व्यापाऱ्यांच्या विक्रीपेक्षा जास्त आहे. भारतातीललहान व्यापारी त्यांच्याशी स्पर्धा करूच शकत नाहीत...
- विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्या महाकाय आहेत. त्या शेतीमालाच्या खरेदीवर मक्तेदारी स्थापित करतीलआणि खरेदीचा भाव पाडून छोट्या शेतकऱ्यांना उध्वस्त करतील.
- या बहुराष्ट्रीय कंपन्या महाकाय आहेत. उत्पादक, घाऊक विक्रेते, वितरक अशा संपूर्ण पुरवठा साखळीवर त्या ताबा मिळवतीलआणि सर्व नफा स्वतःकडेच ठेवतील.ग्राहकांसाठी त्या किमती कमी का करतील?

रिटेलमधील विदेशी गुंतवणूक हे जागतिकीकरणाच्या धोरणांचेच पुढचे पाऊलआहे. या धोरणांमुळेच आज गरीब अजून गरीब आणि श्रीमंत अजून श्रीमंत होत आहेत. या निर्णयामुळे फक्त भारतातील रिटेल विक्रेतेच नाही तर लहान व्यापारी आणि शेतकरीही उध्वस्त होतील.

लोकायत

रु.१०/-



# लढा वॉलमार्टशी

## किरकोळ क्षेत्रात परकीय गुंतवणूकीला विरोध करा
## कोट्यवधी लोकांचे जीवन उध्वस्त होण्यापासून वाचवा!




लोकायत

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रस्तावना | १ |
| १. भारतातील किरकोळ व्यापाराचे क्षेत्र | ४ |
| २. बहुराष्ट्रीय कंपन्या किती मोठ्या आहेत? | ६ |
| ३. रिटेल मधील विदेशी गुंतवणुकीचा किरकोळ व्यापारावर परिणाम | १० |
| ४. शेतकऱ्यांना फायदा होईल काय? | १५ |
| ५. मोठ्या रिटेल मुळे लहान कंपन्याही नष्ट होतील | १९ |
| ६. ग्राहकांना फायदा होईल काय? | २० |
| ७. रिटेल मध्ये विदेशी गुंतवणूक: कोणाच्या हितासाठी? | २२ |
| *संदर्भ* | २६ |
| *आमच्याबद्दल :* लोकायत | ३१ |


## लढा वॉलमार्टशी


**प्रकाशक व मुद्रक**
अलका जोशी, लोकायत, सिंडीकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉप जवळ, पुणे-४

**मुद्रणस्थळ**
आर. एस. प्रिंटर्स, ४५५, शनिवार पेठ, पुणे - ३०

**प्रथम आवृत्ती** : मार्च २०१२
**द्वितीय आवृत्ती** : जानेवारी २०१३
**पुनर्मुद्रण** : मार्च २०१४



**कॉपीराईट नाही**



**सहयोग मूल्य रु. १०/-**


उपयोग करतो, तसेच सेमिनार, व्याख्यान, धरणे, मोर्चे, जाहीर सभाही आयोजित करतो.

- समाजातील विविध समस्या, विशेषत: विकासाच्या नावाखाली उद्ध्वस्त होत असलेले जगजीवन, जात जमातवाद, चंगळवाद, अमेरिकेचा साम्राज्यवाद, जागतिक तापमान वृद्धी, इ. अनेक विषयांवर माहितीपट-चित्रपट दाखवले जातात, त्यांवर चर्चा घडवली जाते. त्यातून प्रश्न समजून घेण्यास मदत होते.
- समाजातील निरनिराळ्या समस्यांबाबत कला आणि सांस्कृतिक माध्यमांमधून जनजागृतीचा प्रयत्न करतो.
- अभिव्यक्ती या महिल्यांच्या गटाद्वारे महिलांचे हक्क प्रस्थापित होण्यासाठी आणि महिलांच्या प्रश्नावर सामाजिक जागृती निर्माण करण्यासाठी कॉलेजेसमध्ये व वस्तीपातळीवर काम करतो.
- या सर्व प्रश्नांवर काम करताना आवश्यक विषयांवर आम्ही पत्रके व पुस्तकेही प्रकाशित करतो.

मित्रांनो आम्ही तुमच्यासारखेच सामान्य लोक आहोत. तुमच्यापैकी अनेकांना आम्ही परिचित नाही. तरीही आम्ही व्यक्त केलेल्या विचाराशी आपण सहमत व्हाल असा आम्हाला विश्वास वाटतो. पण नुसतेच सहमत नाही, तर आमच्या विविध उपक्रमांमध्ये आपला सहभागही आवश्यक आहे. त्यासाठी खाली दिलेल्या पत्त्यांवर तुम्ही आम्हाला नक्की संपर्क करू शकता.


**संपर्क पत्ता**
लोकायत, सिंडीकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉपजवळ, पुणे - ४
(दर रविवारी सायं. ५ ते ७ या वेळेत मिटींग होते.)

**संपर्क फोन**
नीरज जैन 94222 20311
ऋषिकेश येवलेकर 94235 07864

**Website** www.lokayat.org.in
**Email** lokayat.india@gmail.com
**Mailing list** pune.lokayat@lists.riseup.net

# प्रस्तावना

१४ सप्टेंबर २०१२ रोजी विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्या आणि विदेशी सरकारांच्या, खासकरून अमेरिकेच्या, दबावाखाली केंद्रीय कॅबिनेट मंत्रिमंडळाने आपला १० महिन्यापूर्वीचा निर्णय लागू केला. भारतीय अर्थव्यवस्थेच्या आणखी एका महत्वपूर्ण क्षेत्रात म्हणजे मल्टीब्रँड रिटेलमध्ये.# ५१% पर्यंत विदेशी गुंतवणुकीला परवानगी दिली. ५१% गुंतवणुकीची मर्यादा म्हणजे विदेशी कंपनीचे बहुमत व निर्णयांवर ताबा. (मल्टीब्रँड रिटेल दुकानात विविध कंपन्यांनी बनवलेली विविध ब्रँड्सची उत्पादने एकाच छताखाली विकली जातात. सध्या भारतात असलेली बिग बझार किंवा स्पेन्सर्स ही दुकाने त्याच प्रकारातली आहेत.)

## विदेशी हात

कॅबिनेट मंत्रिमंडळाने अगोदर २४ नोव्हेंबर २०११ रोजी मल्टीब्रँड रिटेलला परवानगी दिली होती. (याबरोबरच एकब्रँड रिटेलमधील विदेशी गुंतवणुकीवरील मर्यादा १००% पर्यंत वाढवण्यात आली – ज्यामुळे विदेशी गुंतवणूकदारांची एकट्याची मालकी प्रस्थापित होऊ शकेल.)

या निर्णयामुळे देशभरात, खासकरून व्यापारी संघटनांकडून जोरदार निषेध झाला. १ डिसेंबर २०११ रोजी १०,००० पेक्षा जास्त व्यापारी संघटनांच्या कोट्यवधी व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन देशव्यापी बंद पाळला आणि सरकारच्या निर्णयाच्या निषेधात मोर्चे काढले. राजकीय कुरघोडी करण्याची संधी मिळाल्यामुळे सर्व विरोधी पक्षही या निषेधांमध्ये सामील झाले. देशभरामध्ये याविरोधात तीव्र राग असल्यामुळे सत्ताधारी युपीए सरकारच्या आघाडीमध्येही फूट पडली. तृणमूल कॉंग्रेस आणि द्रमुक सारख्या महत्वाच्या घटक पक्षांनीही हा निर्णय रद्द करण्याची मागणी केली. शेवटी ७ डिसेंबर २०११ रोजी सरकारने या निर्णयाला स्थगित करत असल्याची घोषणा केली.

बलाढ्य बहुराष्ट्रीय रिटेल कंपन्यांनी सरकारच्या या निर्णयावर लगेच तीव्र नाराजी व्यक्ती केली. भारतात दुकाने उघडता यावीत म्हणून त्यांनी स्वत:च्या देशातील लोकप्रतिनिधींवर लॉबींगसाठी लक्षावधी डॉलर्स खर्च केले होते (लाच देण्याला पर्यायी नम्र शब्द म्हणजे लॉबींग). अमेरिकेत या प्रकारचे लॉबींग कायदेशीर आहे आणि दर तिमाहीला अमेरिकन सिनेटसमोर हे तपशील उघडे करणे कंपन्यांना बंधनकारक आहे. वॉलमार्ट या रिटेल क्षेत्रातील बलाढ्य कंपनीने सादर केलेल्या

# किरकोळ व्यापाराला इंग्रजीत रिटेल हा शब्द आहे. या पुस्तिकेत किरकोळ व्यापार आणि रिटेल हे दोन्ही शब्द वापरण्यात आले आहेत



अहवालानुसार, भारतासारख्या विदेशी बाजारावर ताबा मिळावा म्हणून तिने २००८ पासून २.५ कोटी डॉलर्स म्हणजे १२५ कोटी रुपये अमेरिकन लोकप्रतिनिधींवर खर्च केले होते. अर्थातच, यापैकी काही पैसा नक्कीच भारतीय राजकारणी आणि पक्षांच्या खिशात गेला असणार.[1]

ब्रिटनमधील बलाढ्य रिटेल कंपनी टेस्कोने म्हटले: "विदेशी गुंतवणुकीचा निर्णय पुढे ढकलून भारतातील उत्पादक, शेतकरी आणि ग्राहकांनी चांगली संधी गमावली आहे."[2] जर्मन रिटेल कंपनी मेट्रोचे वरिष्ठ अधिकारी म्हणाले की हा निर्णय मागे घेणे फार दुर्दैवी आहे.[3] अगदी मायक्रोसॉफ्ट सारखी कंपनी जी प्रत्यक्षरित्या प्रभावित नव्हती तिनेही मत व्यक्त केले की ती या निर्णयामुळे "खूप निराश झाली आहे" आणि "भारतासाठी कोणत्याही स्वरूपातील विदेशी गुंतवणूक चांगली आहे".[4]

विदेशी कंपन्या आणि त्यांच्या मिंध्या सरकारांनी भारत सरकारवर आर्थिक सुधारणा वेगाने करण्यासाठी दबाव टाकणे चालू केले. 'मोठ्या तीन' आंतरराष्ट्रीय पतमूल्यांकन संस्थांनी भारताच्या धोरणात्मक आणि प्रशासकीय क्षमतांबद्दल शंका व्यक्त केल्या. एप्रिल २०१२ मध्ये 'स्टँडर्ड एन्ड पूअर्स' या पतमूल्यांकन संस्थेने भारताचे मानांकन 'स्टेबल' (स्थिर) वरून 'निगेटिव्ह' (वजा) वर आणले आणि दोन महिन्यांनंतर त्यांनी धमकी दिली की घोषित केलेल्या आर्थिक सुधारणा न राबवल्यास भारताचे सार्वभौम मानांकन 'जंक ग्रेड'ला म्हणजे कचऱ्याच्या भावाला आणले जाईल.[5] लवकरच 'फ़िच' संस्थेने आर्थिक सुधारणांची कमतरता सांगत भारताचे पतमानांकन खाली आणले आणि ऑगस्ट मध्ये 'मूडीज'ने सुद्धा भारताच्या आर्थिक वाढीचा अंदाज खाली आणला. राजकीय अनिच्छेमुळे आर्थिक सुधारणा होत नाहीयेत असे कारण सांगून मोर्गन स्टॅनले आणि गोल्डमन सॅक सारख्या मोठमोठ्या गुंतवणूक कंपन्यांनीही भारताच्या आर्थिक वाढीबद्दल प्रश्न उपस्थित केले.[6]

जुलै २०१२ मध्ये अमेरिकच्या 'टाईम' मॅगझिनच्या आशिया आवृत्तीच्या मुखपृष्ठावर पंतप्रधान मनमोहन सिंग यांचा उदास चेहरा छापून 'अपयशी माणूस' (The Underachiever) असे शीर्षक देण्यात आले होते आणि 'आर्थिक सुधारणांवर हिंमत करू न इच्छिणारा' म्हणून टीका करण्यात आली.[7] काही दिवसांनी अमेरिकन दैनिक 'वॉशिंग्टन पोस्ट' मध्ये मनमोहन सिंग यांचे एक 'दुर्दैवी माणूस' जो 'इतिहासात अयशस्वी म्हणून गणला जाण्याची भिती आहे' असे वर्णन करण्यात आले.[8]

फेब्रुवारी २०१२ मध्ये अमेरिकन सरकारचे आंतरराष्ट्रीय व्यापार सचिव फ्रान्सिस्को सांचेझ यांनी भारताला मल्टीब्रँड रिटेल विदेशी गुंतवणुकीला खुले करण्यास सांगताना म्हटले की "अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी आणि गुंतवणुकीला आकर्षित करण्यासाठी व्यापारास सोयीचे वातावरण तयार करणे भारताच्या हिताचे आहे". ब्रिटनचे व्यापारमंत्री विन्स केबल यांनीही जानेवारी २०१२ मध्ये भारत

भेटीवर असताना हा मुद्दा काढला आणि जुलै २०१२ मध्ये ब्रिटनचे वित्तमंत्री खासदार जॉर्ज ओसबोर्न यांनी भारत सरकारला “रिटेल क्षेत्रात उदारीकरणासाठी जास्त महत्वकांक्षी” असण्याचे आवाहन केले.[9]

जुलै २०१२ मध्ये अमेरिकचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामाही या कोरसमध्ये सामील झाले. ते म्हणाले “भारतातील खराब होत चाललेल्या गुंतवणूक वातावरणाबद्दल” अमेरिकेतील व्यापारी समुदाय चिंतेत आहे. त्यांनी पुढे सांगितले की भारत सरकारने आर्थिक सुधारणांची अजून एक “लाट” आणावी आणि परकीय गुंतवणुकीवरची बंधने व मर्यादा काढून टाकाव्यात.[10]

देशावरील परकीय चलनाचे संकट अधिक गंभीर होत असल्यामुळे (याबद्दल पुढे चर्चा केली आहे) भारत सरकारने शेवटी विदेशी कंपन्या आणि त्यांच्या सरकारांपुढे गुडघे टेकले आणि देशातील व्यापाऱ्यांचा तीव्र विरोध असतानाही देशाचे किरकोळ विक्री क्षेत्र परकीय गुंतवणुकीसाठी खुले केले. २० सप्टेंबर २०१२ रोजी, ज्या दिवशी भारतातील अनेक व्यापारी संघटना आणि राजकीय पक्षांनी या धोरणाविरुद्ध भारत बंद पुकारला त्याच दिवशी, वॉलमार्टसारख्या रिटेल कंपन्यांसाठी देशाचे दरवाजे खुले करण्याची अधिसूचना काढण्यात आली.

## प्रचार

पंतप्रधान मनमोहन सिंग पासून ते होऊ घातलेले पंतप्रधान राहूल गांधी, मुकेश अंबानी ते रतन टाटा, सर्वजण एकसुरात सांगत आहेत: विदेशी कंपन्यांना किरकोळ विक्रीमध्ये परवानगी देणे हा देशातील गंभीर होत असलेल्या आर्थिक संकटाशी लढण्यासाठी एक महत्वाचा उपाय आहे. ते असा दावा करत आहेत की यामुळे महागाई कमी होईल आणि सामान्य माणसाला “दैनंदिन वापराच्या वस्तू कमी किंमतीत मिळतील”. एवढेच नाही तर शेतकऱ्यांचाही फायदा होईल कारण “यामुळे आधुनिक तंत्रज्ञान देशात येईल, शेतमालाची नासाडी कमी होईल आणि शेतकऱ्यांना मालाची अजून चांगली किंमत मिळेल”.[11] वाणिज्य मंत्री आनंद शर्मा तर असेही म्हणाले की यामुळे तीन वर्षात एक कोटी रोजगार निर्माण होतील.[12]

काय हे अतुलनीय धैर्य! गेल्या दशकामध्ये अडीच लाख शेतकऱ्यांना आत्महत्या करायला भाग पाडणारी धोरणे राबवल्यानंतर हे लोक आता शेतकऱ्यांबद्दल कनवाळा दाखवत आहेत! दोन दशकांपूर्वी भारताच्या अर्थव्यवस्थेला परकीय बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी खुले करताना (ज्याला 'जागतिकीकरण' असे गोंडस नाव देण्यात आले) जो तर्क देण्यात येत होता, तोच तर्क आता किरकोळ क्षेत्रामध्ये परकीय थेट गुंतवणुकीला परवानगी देतानाही दिला जात आहे. जागतिकीकरणाच्या या धोरणांमुळे निश्चितपणे भारतातील उच्चभ्रू वर्गाला मोठा फायदा झाला आहे: भारतामध्ये १० लाख डॉलर्स (४.६ कोटी रुपये) पेक्षा जास्त संपत्ती असलेल्या



लोकांची संख्या अगोदरच्या वर्षाच्या तुलनेत ५१% नी वाढून २००९ मध्ये १.२७ लाख झाली.[13] तर दुसरीकडे ७७% जनता किंवा ८३.६ कोटी लोक आजही दिवसाला रु.२० पेक्षा कमी किंमतीत जगत आहेत. ८७% पेक्षा जास्त ग्रामीण जनतेला दैनंदिन आवश्यक अशा किमान २४०० कॅलरीजही मिळत नाहीत.[14] शेवटी नोकऱ्या निर्माण होतील हा त्यांचा दावा तर हास्यास्पद आहे, कारण याच प्रकारच्या धोरणांमुळे गेल्या दशकामध्ये फक्त नोकरीविहीन 'विकास' या देशात झाला आहे.[15]

अशाप्रकारची व्यापक टीका बाजूला ठेवून अगोदर परकीय रिटेल कंपन्या भारतीय अर्थव्यवस्थेत आल्यावर भारतातील किरकोळ व्यापाराच्या क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांवर विचार करूया. त्यानंतर ग्राहक आणि शेतकऱ्यांना जो तथाकथित फायदा होणार आहे, त्यावरही नजर टाकूया.

# १. भारतातील किरकोळ व्यापाराचे क्षेत्र

अधिकृत आकडे उपलब्ध नसले तरी, भारतातील किरकोळ व्यापाराचा आजचा आकार ४००–४५० अब्ज डॉलर्स आहे असा अंदाज सांगितला जातो.[16] शेतीनंतर रोजगार पुरवणारे हे सर्वात मोठे क्षेत्र आहे, आणि आजच्या घडीला जवळपास ४ कोटी लोकांना या क्षेत्रामध्ये रोजगार आहे. हा आकडा देशातील एकूण रोजगाराच्या १०% आहे.[17]

रोजगार निर्मितीच्या दृष्टीने हे सर्वात महत्वाचे क्षेत्र आहे, कारण गेल्या दोन दशकांमधील आर्थिक धोरणांच्या परिणामाने शेती आणि वस्तुनिर्माण क्षेत्रातील रोजगारनिर्मिती जवळपास स्थगितच झाली आहे.[18] बेरोजगारी भत्त्यासारख्या कोणत्याही प्रकारच्या सामाजिक सुरक्षा योजनेच्या अभावामुळे हे क्षेत्र एकप्रकारे 'रोजगारासाठी शेवटचा आधार' बनले आहे. जेव्हा एखादा कारखाना बंद होतो आणि कामगार रस्त्यावर येतात, जेव्हा शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीवरून हाकलले जाते किंवा वर्षभरात जेव्हा शेतात काम नसते, किंवा जेव्हा तरुण पदवीधरांना रोजगार मिळत नाही, तेव्हा किरकोळ व्यापाराचे क्षेत्र त्यांना सामावून घेते. एखादा कुशल कामगार रस्त्यावर हातगाडी चालवतो, एखादा शेतकरी पान–विडीची टपरी टाकतो, एखादा शिकलेला तरुण दारोदारी वर्तमानपत्र टाकण्याचे काम करतो, आणि एखादा थोडं जास्त शिकलेला बेरोजगार माणूस टेलिफोन बूथ टाकतो आणि त्याबरोबर फोनची कार्डही विकतो.

केंद्रीय सर्वेक्षण संस्थेने (सेंट्रल स्टॅटिस्टीकल ऑर्गनायझेशन) २००५ मध्ये देशपातळीवर केलेल्या 'आर्थिक जनगणने'नुसार, भारतात १.४९ कोटी किरकोळ व्यापाराची (रिटेल) दुकाने होती.[19] भारतातील किरकोळ वस्तूंच्या व्यापारात अधिकांश लहान दुकानदार आहेत. यामध्ये किराणा, मालकी हक्काची जनरल स्टोर्स, फर्निचर, औषधे, कटलरी, हार्डवेअर, पादत्राणे, कपडे, स्टेशनरी, बेकरी,

भाजीपाला आणि फळे, पान–विडीची दुकाने, हातगाड्या, पथारीवाले, इ. सर्व प्रकारची दुकाने येतात. हे सर्व “असंघटित किरकोळ व्यापार” किंवा पारंपरिक किरकोळ व्यापार क्षेत्रात मोडतात. एकूण रिटेल विक्रीपैकी ९३% विक्री याच क्षेत्रातून होते. संघटित रिटेल व्यापारामधून फक्त ७% विक्री होते. संघटित रिटेलमध्ये कंपन्यांनी चालवलेले मॉल्स, किरकोळ–व्यापाराची साखळी दुकाने (चेन्स), आणि खाजगी मालकीची मोठी दुकाने येतात.

## संघटित रिटेल: जोरात वाढतंय

संघटित रिटेल क्षेत्रामध्ये गेल्या काही वर्षात फार मोठी वाढ झाली आहे. इंडियन कौन्सिल फॉर रिसर्च ऑन इंटरनॅशनल इकॉनॉमिक रिलेशन्स या संस्थेने मे २००८ मध्ये केलेल्या एका शासनपुरस्कृत अभ्यासानुसार, २००६–०७ ते २०११–१२ या काळात असंघटित रिटेल क्षेत्राची वाढ दरवर्षी १०% तर संघटित रिटेल क्षेत्राची वाढ दरवर्षी ४५–५०% या दराने होईल असा अंदाज सांगितला होता.[20] ए.टी.किअर्नी ही एक जागतिक व्यवस्थापन सल्लागार संस्था आहे. यांच्या २०११ मधील जागतिक रिटेल विकास निर्देशांकानुसार (रिटेल क्षेत्रात सर्वात वेगाने पुढे येणाऱ्या ३० देशांची ही यादी आहे; या यादीच्या आधारावर जगातील बलाढ्य रिटेल कंपन्या गुंतवणुकीची योजना बनवतात) संघटित रिटेलचा भारताच्या एकूण व्यापारातील हिस्सा सध्याच्या ७% वरून २०२० मध्ये २०% पर्यंत जाण्याचा अंदाज आहे.[21]

१९९९ मध्ये भारतात फक्त ३ मॉल्स होते, आणि त्यांनी १० लाख स्क्वे.फुटांपेक्षाही कमी जागा व्यापलेली होती. त्यानंतर भारतातील मॉल्सची संख्या आणि त्यांनी व्यापलेल्या जागा वेगाने वाढल्या आहेत. २००६ संपेपर्यंत भारतात १३७ मॉल्स झाले होते आणि त्यांनी २८० लाख स्क्वे.फुट जागा व्यापली होती; म्हणजे दरवर्षी ३९ लाख स्क्वे.फुट या दराने वाढ झाली होती. २००६ नंतर मॉल्सची जागा दरवर्षी ८० लाख स्क्वे.फुट या दराने वाढत आहे. २००९ पर्यंत देशात १७२ मॉल्स झाले होते, ज्यांनी ५२० लाख स्क्वे.फुट जागा व्यापली होती आणि २०१२ पर्यंत मॉल्सने व्यापलेली जागा याच्या दुप्पट असेल असा अंदाज आहे.[22] भारतातील सर्वात मोठ्या औद्योगिक घराण्यांपैकी काही संघटित रिटेलच्या क्षेत्रात उतरली आहेत. यामध्ये रिलायन्स (रिलायन्स फ्रेश, रिलायन्स मार्ट, हायपरमार्ट), आदित्य बिर्ला समूह (मोर), टाटा समूह (वेस्टसाईड, स्टार इंडिया बझार, लँडमार्क), के. रहेजा समूह (शॉपर्स स्टॉप, क्रॉसवर्ड, इनऑर्बिट मॉल), आर.पी.गोयंका समूह (स्पेन्सर्स) ही नावं येतात.

संघटित रिटेलमधील जोरदार वाढीमुळे लहान दुकानदारांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम झाला आहे. एका सर्वेक्षणानुसार बंगळूर, अहमदाबाद आणि चंदीगढ



सारख्या शहरांमध्ये ३३–६०% पारंपरिक फळ अणि भाजी विक्रेत्यांची विक्री १०–३०% ने कमी झाली आणि उत्पन्न २०–३०% नी कमी झाले असे दिसून आले आहे.[23] आता वॉलमार्ट आणि टेस्को सारख्या महाकाय बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारतात प्रवेशाची परवानगी मिळाल्यामुळे असंघटित रिटेलचे क्षेत्र आणखीन मोठ्या प्रमाणात नष्ट होईल.

असे का होईल हे समजून घेण्यासाठी अगोदर या बहुराष्ट्रीय कंपन्यांचा आकार आणि अर्थशास्त्र समजून घेणे आवश्यक आहे.

# २. बहुराष्ट्रीय कंपन्या किती मोठ्या आहेत?

आजची जागतिक अर्थव्यवस्था मूठभर महाकाय बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रभावाखाली आहे. बहुराष्ट्रीय कंपनी म्हणजे अशी कंपनी जिचे मुख्य कार्यालय एका देशात असते, पण ती अनेक देशांमध्ये काम करते. बहुतांश बहुराष्ट्रीय कंपन्याची मुख्यालये अमेरिका, युरोपियन युनियन, जपान अशा श्रीमंत देशांमध्ये आहेत. अलीकडच्या काळात मात्र काही तिसऱ्या जगातील देशांमध्येही बहुराष्ट्रीय कंपन्या उदयास आलेल्या दिसतात.

आजच्या काळात जे अर्थशास्त्र शिकवले जाते, त्यामध्ये व्यापारात गळेकापू स्पर्धा होते असे सांगितले जाते. परंतु वास्तव त्याच्या उलट आहे. आज प्रत्येक आर्थिक क्षेत्रावर मूठभर बलाढ्य कंपन्यांचा ताबा आहे. मग ते मोटारी, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि औषधांचे उत्पादन असो वा रिटेल, वाहतूक आणि माहिती तंत्रज्ञान असो, किंवा बँकिंग व वित्तपुरवठा इथपासून ते शेतीची विविध क्षेत्रे (बियाणे बनवण्यापासून ते किटकनाशकांपासून ते अन्नधान्य उत्पादनापर्यंत) असोत, सर्व क्षेत्रांमध्ये आज थोड्याच बलाढ्य कंपन्यांचे अधिराज्य आहे. इथे आपण मूठभर कंपन्यांच्या एखाद्या देशातील एखाद्या आर्थिक क्षेत्राच्या नियंत्रणाबद्दल बोलत नाही, तर त्यांच्या त्या आर्थिक क्षेत्राच्या जागतिक स्तरावरील नियंत्रणाबद्दल बोलतोय. एकच बहुराष्ट्रीय कंपनी पन्नासपेक्षाही जास्त देशांमध्ये काम करत असते, आणि तत्सम इतर मूठभर बहुराष्ट्रीय कंपन्या मिळून त्या विशिष्ट क्षेत्रातल्या जागतिक उत्पादनावर पूर्ण ताबा ठेवतात.

एक उदाहरण बघूया. आज ५ बहुराष्ट्रीय कंपन्या जगभरातील जवळपास निम्म्या मोटारी बनवतात, आणि १० कंपन्या ७०% वाहने बनवतात. उरलेल्या कंपन्यांकडे जागतिक बाजाराचा फारच थोडा हिस्सा आहे.[24] याचाच सरळ अर्थ असा की या छोट्या कंपन्या कधीच मोठ्या कंपन्यांना आव्हान देऊ शकणार नाहीत. म्हणजेच येत्या काही वर्षांमध्ये त्या आपापसातच विलीन होतील किंवा मोठ्या कंपन्या त्यांना गिळून टाकतील. याचा आणखी एक अर्थ असा की जगातील वाहन उद्योगावर राज्य करणाऱ्या या मूठभर कंपन्यांना आव्हान देण्यासाठी भविष्यात नवीन

कंपन्या उदयास येण्याची शक्यता जवळपास शून्य आहे.

'वॉल स्ट्रीट जर्नल' मध्ये १९९९ मध्ये प्रकाशित 'चला, एकाधिकाराचा खेळ खेळूया' (Let's Play Oligopoly) या शीर्षकाच्या एका लेखात म्हटले आहे की:

> प्रत्येक उद्योगामध्ये विलीनीकरणाला पर्याय नाही ... जागतिक वाहन उद्योग आता सहा ते आठ कंपन्यांमध्ये एकत्रित होत आहे. यामध्ये दोन अमेरिकन, दोन जपानी आणि काही युरोपियन कंपन्याच शिल्लक राहतील असा अंदाज आहे.
>
> जगात सेमिकंडक्टर बनवणाऱ्या कंपन्या डझनभरच आहेत. संगीत ध्वनिमुद्रणाच्या क्षेत्रात चारच कंपन्या आहेत. दहा कंपन्यांचा औषधनिर्मितीच्या क्षेत्रावर ताबा आहे, आणि हा आकडाही कमी होणार आहे कारण जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी या कंपन्याही एकमेकीत विलीन होत आहेत.
>
> जागतिक शीतपेयांच्या व्यवसायात फक्त तीन कंपन्या महत्वाच्या आहेत. त्यांच्यापैकी सर्वात लहान 'कॅडबरी श्वेप्स' ने जानेवारी १९९९ मध्ये आपल्या धंद्याचा एक भाग कोका-कोलाला विकून टाकला. व्यावसायिक विमान क्षेत्रात जगभरात फक्त दोन कंपन्या आहेत: बोईंग आणि एअरबस.[25]

हे सर्व दहा वर्षांपूर्वीचे वास्तव आहे. तेव्हापासून बहुराष्ट्रीय कंपन्यांचे एकीकरण अजून वाढले आहे. अलीकडे म्हणजे २००५ मध्ये इटीसी ग्रुप या एका आंतरराष्ट्रीय संस्थेने जगातील सर्वात मोठ्या दहा कंपन्यांच्या बाजार-हिश्श्याचा अभ्यास केला, आणि खालील आश्चर्यकारक तथ्ये मांडली:[26]

- ✓ जगातील सर्वात मोठ्या १० बियाणे कंपन्या २१०० कोटी डॉलर्सच्या जागतिक बाजारापैकी जवळपास अर्ध्या भागावर ताबा ठेवून आहेत.
- ✓ किटकनाशकांमध्ये, जगातील १० सर्वात मोठ्या कंपन्यांचा २९५६ कोटी डॉलर्सच्या जागतिक बाजारापैकी ८४% वर ताबा आहे.
- ✓ प्राण्यांच्या औषधनिर्मिती क्षेत्रामध्ये, सर्वात मोठ्या दहा कंपन्या २०२५ कोटी डॉलर्सच्या जागतिक बाजारापैकी ५५% बाजारावर ताबा ठेवून आहेत.
- ✓ जगातील १० सर्वात मोठ्या जैवतंत्रज्ञान कंपन्यांकडे जवळपास तीन-चतुर्थांश जागतिक बाजार आहे.

वर दिलेले आकडे सुद्धा मक्तेदारीची खरी ताकद दाखवत नाहीत. यामध्ये जगभरात आपले जाळे वाढविण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांतर्फे बनवण्यात येणारे विविध हितसंबंधी गट आणि भागीदारी विचारात घेतलेले नाहीत. यात उप-कंत्राटे,



व्यवस्थापनविषयक करार, संपूर्ण प्रकल्पांची कंत्राटे, शाखा चालवणे, सामाईक उत्पादन इत्यादी प्रकार सामील आहेत. जसे, बहुराष्ट्रीय कंपन्या कामगारांवरचा खर्च कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आपले काम तिसऱ्या जगातील कंत्राटदारांना उप-कंत्राट म्हणून देतात. याचे प्रमाण इतके जास्त आहे की कमीतकमी ४०% जागतिक व्यापार बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आऊटसोर्सिंग (दुसऱ्या देशात काम करवून घेणे) केलेल्या कामाशी निगडीत आहे. उदाहरणार्थ, नाईके ही बुटांची कंपनी स्वत: एकही बूट बनवत नाही, तर सर्व काम दक्षिण कोरिया, चीन, इंडोनेशिया, थायलंड, व्हिएतनाम यासारख्या देशांमध्ये आऊटसोर्स करते.

आणखी एक महत्वाचं उदाहरण पाहू. मायक्रोसॉफ्ट ही जगातील सर्वात शक्तिशाली कंपन्यांपैकी आहे, पण तिनेही एरिक्सन, ब्रिटिश टेलिकम्युनिकेशन्स, टेल्मेक्स व इतर कंपन्यांसोबत युती केलेली आहे.

जगातील विमान कंपन्या तर एक पाऊल पुढे आहेत. त्यांनी सर्वांनी मिळून काही मूठभर मोठ्या-भागीदाऱ्या बनवल्या आहेत. उदाहरणार्थ, यापैकी एक आहे स्टार अलायन्स. यामध्ये युनायटेड एअरलाईन्स, कॉटीनेंटल एअरलाईन्स, यू.एस. एअरवेज (अमेरिका); एअर कॅनडा (कॅनडा); बी.एम.आय. (ब्रिटन); लुफ्थांसा (जर्मनी); ब्रुसेल्स एअरलाईन्स (बेल्जियम); स्विस (स्वित्झर्लंड); ऑस्ट्रियन (ऑस्ट्रिया); स्पॅनएअर (स्पेन); टॅप पोर्तुगाल (पोर्तुगाल); लोट पोलिश एअरलाईन्स (पोलंड); क्रोएशिया एअरलाईन्स (क्रोशिया); अद्रिया (स्लोवेनिया); एसएएस (स्कँडेनेव्हिया); ब्लु-वन (फिनलंड); एजियन (ग्रीस); टर्कीश एअरलाईन्स (टर्की), इजिप्तएअर (इजिप्त); थाई (थाईलंड); सिंगापूर एअरलाईन्स (सिंगापूर); ताम (ब्राझील); एअर न्युझिलंड (न्युझिलंड); साऊथ आफ्रिकन एअरवेज (दक्षिण आफ्रिका); एएनए (जपान); एशियाना एअरलाईन्स (कोरिया); एअर चायना (चीन) इतक्या सगळ्या विमान कंपन्या आहेत. या सर्व विमान वाहतूक कंपन्या पैसे वाचविण्यासाठी त्यांची विमाने, खानपान सुविधा, प्रशिक्षण, देखरेख, आणि अगदी विमान विकत घेण्याचे कामही सोबत मिळून करत आहेत. परिणामी सर्वात मोठ्या अशा अमेरिकेतील युनायटेड एअरलाईन्स च्या नेतृत्वाखाली जागतिक स्तरावर काम करणाऱ्या विमानांचा ताफा तयार झाला आहे.[27]

या आणि इतर प्रकारांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांचा जो विस्तार चालला आहे, त्यातून एक अतिकेंद्रीत जागतिक अर्थव्यवस्था तयार होत आहे. या कंपन्यांची जागतिक अर्थव्यवस्थेवरची पकड 'फॉर्च्युन' या मासिकाने तयार केलेल्या जगातील सर्वात मोठ्या ५०० कंपन्यांच्या उत्पन्नाच्या आकड्यांवरून कळते. या सर्वांचे एकत्रित उत्पन्न जगाच्या सर्व राष्ट्रांच्या एकूण राष्ट्रीय उत्पादनाच्या (GDP) ३५-४०% इतके जास्त आहे![28]

अगदी अलीकडचा अभ्यास बहुराष्ट्रीय कंपन्यांचे जागतिक अर्थव्यवस्थेवरील

नियंत्रण आणखी स्पष्ट करतो. जगात सद्यस्थितीत ६३,००० पेक्षा जास्त बहुराष्ट्रीय कंपन्या (२००३ चा आकडा) आहेत. जेव्हा झुरीकमधील स्विस फेडरल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी या संस्थेने ४३,००० बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील संबंध तपासले तेव्हा प्रत्यक्षात असे दिसून आले की या सर्व कंपन्यांचा ताबा वेगवेगळ्या प्रकारे फक्त १३१८ बलाढ्य कंपन्यांकडे आहे. जगातील एकूण महसूलाच्या २०% हिस्सा या १३१८ कंपन्यांकडे आहे. त्याशिवाय इतर कंपन्यांमधील भागीदारीमुळे यांच्याकडे एकूण जागतिक महसूलाचा अजून ६०% ताबा आहे.[29]

थोड्याशा बलाढ्य कंपन्यांचा जागतिक अर्थव्यवस्थेवर निर्णायक ताबा आहे यात काहीच शंका नाही, आणि याचे परिणाम जगाच्या भवितव्यासाठी अत्यंत धोकादायक आहेत.

## बहुराष्ट्रीय कंपन्या आणि स्पर्धा

काही थोड्या महाकाय कंपन्यांचा जागतिक उत्पादनावर ताबा असल्यामुळे जागतिक अर्थकारणात अजून एक महत्वाचा बदल झाला आहे तो असा की आता या कंपन्या एकमेकींशी किंमत कमी करण्याची स्पर्धा करत नाहीत.

पारंपरिक अर्थशास्त्रातील स्पर्धेच्या सिद्धांतात असे गृहीत धरले आहे की मोठ्या संख्येने लहान कंपन्या कार्यरत आहेत आणि त्या एकमेकींशी गळाकापू स्पर्धा करतात. वस्तूंचे उत्पादन, किंमत, गुंतवणूक ह्यापैकी काहीही त्यांच्या हातात नसून हे सर्व बाजार ठरवते.

बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उदयाबरोबर हे चित्र पूर्णपणे बदलून गेले आहे. एक बलाढ्य कंपनी एखाद्या क्षेत्रात बहुतांश उत्पादन करत असल्यामुळे ती किंमत, उत्पादन, आणि गुंतवणुकीचा प्रकार आणि आकार यावर नियंत्रण ठेवू शकते. त्यामुळे पाठ्यपुस्तकांमध्ये जरी पारंपरिक अर्थशास्त्र शिकवले जात असले तरी बहुराष्ट्रीय कंपन्यांचे अर्थकारण समजण्यासाठी हे शास्त्र योग्य नाही.[30]

मक्तेदार बहुराष्ट्रीय कंपन्या संख्येने कमी असल्यामुळे आपापसांत किंमतींमध्ये स्पर्धा न करण्याचा अलिखित संकेत पाळतात. कारण ह्या कंपन्या महाबलाढ्य आहेत; सर्वांजवळ अमाप भांडवल आहे; सगळ्या भरपूर नुकसान सहन करू शकतात; आणि म्हणून जर त्यांनी आपसात किंमतींची स्पर्धा केली तर त्या सगळ्याच आपला सर्वनाश ओढवून घेतील. त्यामुळे 'किंमत युद्ध' करण्यापेक्षा त्या किंमत ठरवण्यासाठी हातमिळवणी करतात. जर अशाप्रकारेच किंमती ठरवायच्या असतील तर किंमती कमी का ठेवाव्यात? त्यामुळे त्या किंमती जास्तच ठेवतात आणि अवाढव्य नफे कमवतात.[31] (याचाच अर्थ असाही आहे की जेव्हा गरज वाटेल तेव्हा काही काळासाठी त्या किंमती कमीही करू शकतात, उदा. लहान कंपन्यांना स्पर्धेमध्ये नष्ट करण्यासाठी. गरज संपल्यावर मग त्या किंमती परत पुन्हा



वाढवतात.)

याचा अर्थ हा नाही की बहुराष्ट्रीय कंपन्यांमधली स्पर्धा संपली आहे. त्यांच्यामध्ये पूर्वीप्रमाणेच गळेकापू स्पर्धा आहे. फक्त आता तिचे स्वरूप बदलले आहे. आता त्या उत्पादन खर्च कमी करण्यासाठी, नैसर्गिक साधनसंपत्तीवर ताबा मिळवण्यासाठी आणि जाहिरातींद्वारे बाजारपेठेतील आपला हिस्सा वाढवण्यासाठी स्पर्धा करतात.

# ३. रिटेल मधील विदेशी गुंतवणुकीचा किरकोळ व्यापारावर परिणाम

इतर क्षेत्रांप्रमाणेच किरकोळ क्षेत्रातही कंपन्यांचे एकत्रीकरण आणि बलाढ्य होणे जोरात चालू आहे. जगातील सर्वसाधारण वस्तूंच्या रिटेलचे क्षेत्र वॉलमार्ट, टेस्को, कॅरेफोर आणि मेट्रो सारख्या अमेरिका आणि पश्चिम युरोपमध्ये मुख्यालय असलेल्या कंपन्यांच्या ताब्यात आहे. या रिटेल कंपन्या आपल्या कल्पनेपेक्षाही प्रचंड मोठ्या आहेत. २००९-१० मध्ये जगातील सर्वात मोठी रिटेल कंपनी वॉलमार्टची एकूण वार्षिक विक्री ४०५ अब्ज डॉलर्स होती. इतर मोठ्या कंपन्यांपैकी कॅरेफोरची (फ्रान्स) वार्षिक विक्री १६३.८ अब्ज डॉलर्स होती, मेट्रोची (जर्मनी) विक्री ९१.४ अब्ज डॉलर्स आणि टेस्कोची (ब्रिटन) विक्री ९०.१ अब्ज डॉलर्स होती.[32] याचाच अर्थ असा की वॉलमार्ट एकटी भारतातील १.५ कोटी रिटेल व्यापाऱ्यांपेक्षा जास्त माल विकते! एकदा का या बलाढ्य कंपन्यांनी भारतातील रिटेल क्षेत्रामध्ये आपले जाळे पसरले, तर भारतातील लहान दुकानदार त्यांच्याशी स्पर्धा करूच शकणार नाहीत आणि त्यामुळे ते नष्ट होणार हे नक्की आहे. भारतातील कॉर्पोरेट रिटेल कंपन्या मात्र या मोठमोठ्या विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांसोबत हातमिळवणी करून त्यांचे लहान भागीदार बनतील. काही वर्षातच भारतातील रिटेल क्षेत्र मूठभर मोठ्या बहुराष्ट्रीय रिटेल कंपन्यांच्या ताब्यात गेलेले असेल.

या कंपन्यांची काम करण्याची पद्धत सोपी आहे. त्यांचा आकार आणि आर्थिक ताकदीमुळे त्या जगातील सर्वात कमी किंमतीत माल पुरवणाऱ्या निर्मात्यांकडून वस्तू विकत घेतात, उदाहरणार्थ: चीन. वस्तुस्थिती पाहिली तर वॉलमार्ट दरवर्षी अब्जावधी डॉलर्सच्या वस्तू चीनमधून विकत घेते. 'वॉशिंग्टन पोस्ट' मधील एका बातमीनुसार वॉलमार्टच्या ६,००० पुरवठादार कंपन्यांच्या यादीत ८०% कंपन्या चीनमधल्या आहेत.[33] अन्नधान्य उत्पादनाबाबतीत त्या थेट शेतकऱ्यांकडून माल विकत घेणार (यासाठी केंद्र सरकार राज्य सरकारांवर दबाव टाकत आहे की त्यांनी आपले एपीएमसी म्हणजे कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे कायदे बदलावेत, आणि बहुसंख्य राज्यांनी याला लागू केले आहे.)[34] त्यामुळे त्या लहान दुकानदारांच्या तुलनेत कमी किंमतीत माल विकू शकतील. गरज पडलीच तर लहान दुकानदारांना

स्पर्धेत मारून टाकण्यासाठी ह्या अतिश्रीमंत कंपन्यांची काही वर्षे तोटा सहन करत व्यवसाय करण्याचीही तयारी असते. परिणामी, किराणा दुकानदार, रस्त्यावरील हातगाडी आणि पथारीवालेच नाही तर घाऊक व्यापारी आणि वितरकांचेही संपूर्ण जाळे यामुळे उध्वस्त होईल.

## विकसित देशांमधील लहान रिटेलचा विध्वंस

उद्योगविश्वाचे भाट मात्र उलट सांगत आहेत की ही सर्व अतिशयोक्ती आहे, लहान दुकाने आणि मोठमोठे मॉल्स एकत्र शेजारी नांदू शकतात. ते खोटं बोलत आहेत. जगात कुठेही असे झालेले नाही. विकसित देशांमध्ये तर लहान रिटेल जवळपास संपले आहे. अमेरिकेत १९९२–२००७ या काळात सर्वात मोठ्या ४ रिटेल कंपन्यांचा विविध क्षेत्रातील व्यापाराचा वाटा कसा वाढलाय हे तक्ता क्रं. १ मध्ये दाखवले आहे.[35]

**तक्ता १: अमेरिकेतील सर्वात मोठ्या ४ कंपन्यांचा रिटेल विक्रीतील हिस्सा (%)**

| रिटेलचे क्षेत्र | १९९२ | २००७ |
|---|---|---|
| अन्न आणि शीतपेये | १५.४ | २७.७ |
| आरोग्य आणि वैयक्तिक वापराच्या वस्तू | २४.७ | ५४.४ |
| जनरल विक्रीच्या वस्तू | ४७.३ | ७३.२ |
| पुस्तकांची दुकाने | ४१.३ | ७१.० |
| संगणक आणि सॉफ्टवेअर | २६.२ | ७३.१ |

मोठ्या रिटेल कंपन्यांचा विस्तार हा अर्थातच लहान रिटेलचा बळी देऊनच झालेला आहे. रोबर्ट रेईच (क्लिंटन प्रशासनातील कामगार सचिव) म्हणतात: "वॉलमार्ट लहान दुकानदारांचा धंदा शोषून घेते आणि रस्त्यांचे रूपांतर स्मशानामध्ये करते".[36] अमेरिकेतील आयोवा राज्य विद्यापीठातील प्रा. केनेथ स्टोन यांनी केलेल्या अभ्यासात असे दिसून आले की "शेजारी वॉलमार्ट उघडल्यानंतर लहान शहरांना १० वर्षांनंतर ४७% पर्यंत रिटेल व्यापाराचा फटका बसतो".[37]

वॉलमार्ट सारख्या महाकाय कंपन्यांच्या मॉल्सचा लहान दुकानदारांच्या धंद्यावर इतका वाईट परिणाम होत आहे की अमेरिकेतील क्लीवलंड, शिकागो, फ़्लॅगस्टाफ, सॅन डिएगो, इंग्लेवुड, रोझमीड, लॉग बीच, टक्सन, स्पोकेन, न्यूयॉर्क सिटी अशा अनेक शहरांमध्ये लोकांनी एकत्र येऊन (कमी–अधिक यश मिळवत) वॉलमार्टच्या प्रवेशाला विरोध केला आहे. वॉलमार्टने सर्व हातखंडे आजमावत या सर्व विरोधाला नमवण्याचे प्रयत्न केले आहेत. यामध्ये विरोधकांना लाच देणे, विखारी प्रचार अभियाने राबवणे, आक्रमक कायदेशीर चाली खेळणे हे सर्व हातखंडे येतात.



याशिवाय २०००–०५ मध्ये वॉलमार्टने कॅलिफोर्नियामध्ये स्वत:च्या समर्थनात अभियाने राबवण्यासाठी स्थानिक दलाल गटांवर ४३ लाख डॉलर्स खर्च केले.[38]

१९७०–८० च्या दशकामध्ये जेव्हा मोठमोठ्या रिटेल कंपन्यांचा उदय होत होता, तेव्हा युरोपातील अनेक देशांनी सुरुवातीला मोठ्या रिटेल कंपन्यांवर निर्बंध घालण्यासाठी कायदे बनवले. उदाहरणार्थ फ्रान्समध्ये लो–रोय आणि बेल्जियम मध्ये लो–दे–कादेना हे कायदे. यामध्ये मोठ्या रिटेलची दुकाने रविवारी सरसकट बंद करण्यापासून ते फक्त काही तास उघडी ठेवण्यासारखे निर्बंध घालणारे कायदे बनवले गेले.[39] काही ठिकाणी मॉलच्या आकारावर निर्बंध होते तर काही ठिकाणी कोणत्या भागात मॉल उघडता येईल यावर निर्बंध होते.[40] परंतु १९९० नंतर जगात रिटेलसह सर्व क्षेत्रात वाढलेल्या मक्तेदारीमुळे मोठ्या रिटेलच्या दबावाखाली युरोपातील अनेक देशांनी हळूहळू असे निर्बंध उठवणे चालू केले आहे. यामुळे छोट्या दुकानदारांची अधोगती आणि मोठ्या रिटेलच्या हातात व्यापार जाण्याला चालना मिळाली.

लहान दुकानदारांसाठी याचे परिणाम विध्वंसक झाले आहेत. २००५ पर्यंत युरोपातील डेन्मार्क, स्वीडन, स्वित्झर्लंड, जर्मनी आणि ब्रिटनसह अनेक देशांमधील ६५–७५% किराणा व्यापार सर्वात मोठ्या ५ रिटेल कंपन्यांच्या ताब्यात आलेला होता.[41] ब्रिटनमधील अनेक भागांमध्ये तेथील सर्वात मोठी रिटेल कंपनी टेस्कोचे अन्न बाजारावर जवळपास पूर्ण नियंत्रण आहे.[42]

## तिसऱ्या जगातील किरकोळ व्यापाराचा विध्वंस

दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या तिसऱ्या जगातील अनेक देशांनी औद्योगिक क्रांती घडवण्यासाठी विकसित देशांची नक्कल करत स्वावलंबी भांडवली विकास घडवण्याचा प्रयत्न केला. यासाठी उचलण्यात आलेल्या पावलांमध्ये परकीय गुंतवणुकीवर मर्यादा घालणे हे एक महत्वपूर्ण धोरण होते.

परंतु या विकासाच्या मॉडेलच्या स्वत:च्या अंतर्गत मर्यादा होत्या. भारतासारख्या तिसऱ्या जगातील देशांना भांडवली विकासाचे पश्चिमी मॉडेल राबवणे शक्यच नव्हते. (यावर चर्चा करणे या पुस्तकाच्या कक्षेबाहेर ठरेल.) म्हणूनच १९७० च्या दशकापासून हे मॉडेल अपयशी ठरताना दिसू लागले आणि तिसऱ्या जगातील अनेक देश परकीय कर्जाच्या संकटात सापडू लागले. तेव्हा लगेच त्यांचे परकीय धनको अमेरिका, पश्चिम युरोप आणि जपानसारख्या विकसित भांडवलशाही देशांनी संगनमत करून या देशांचा हात पिरगाळणे चालू केले. तिसऱ्या जगातील देशांना त्यांच्या अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्यासाठी आणि विदेशी भांडवल व सामानासाठी ती खुली करायला त्यांनी भाग पाडले.

याचाच भाग म्हणून त्यांनी कर्जबाजारी देशांना रिटेलचे क्षेत्र पाश्चात्य देशांमधील कंपन्यांसाठी खुले करण्याचा महत्वाचा धोरणात्मक निर्णय घ्यायला लावला. याचे परिणाम अपेक्षेप्रमाणे झाले आहेत. जिथे जिथे या कंपन्या गेल्या, तिथे तिथे काही वर्षातच या कंपन्यांनी लाखो लहान दुकानदारांना धंद्यातून नष्ट केले आणि व्यापारावर ताबा मिळवला. तुर्कस्तान पासून ब्राझील ते दक्षिण आफ्रिकेपर्यंत तिसऱ्या जगातील प्रत्येक देशामध्ये हेच घडल्याचे दिसून आले आहे. वॉलमार्टने मेक्सिको मध्ये १९९१ मध्ये प्रवेश केला आणि एका दशकातच (२००१ पर्यंत) तिने जवळपास अर्ध्या (४५.६%) बाजारावर ताबा मिळवला[43] आणि २०११ पर्यंत ५५% किरकोळ व्यापारावर वर्चस्व जमवले.[44] हीच गोष्ट इतर दक्षिण अमेरिकन देशांमध्येही घडली आहे. ब्राझीलमध्ये १९८७ ते १९९६ या काळात रस्त्यावरील फळे आणि भाजी विक्रेत्यांचा खप २७.८% ने कमी झाला; अर्जेंटीनामध्ये १९८४ ते १९९३ या काळात लहान दुकानांची संख्या ३०% नी कमी झाली आणि रिटेल क्षेत्रातील रोजगार २६% ने कमी झाला; आणि चिलीमध्ये १९९१–९५ या काळात 'पारंपरिक' अन्न आणि पेयं विकणाऱ्यांची संख्या २०% नी कमी झाली.[45] आता दक्षिण अमेरिकेतील अनेक देश या बलाढ्य रिटेल विक्रेत्यांवर बंधने घालणारे कायदे बनवत आहेत.

पूर्व आशियामध्ये, किरकोळ अन्न विक्रीमधील सुपरमार्केट्सचा वाटा १९९६–२००५च्या दरम्यान २०% वरून ५०% पर्यंत गेला.[46] याचा लहान दुकानदारांवरील परिणाम इतका उध्वस्त करणारा होता की तिथे दंगली झाल्या, आणि अनेक देशांना मोठ्या विक्रेत्यांवर बंधने घालावी लागली.[47]

आता भारतात अशा मोठ्या रिटेलला परवानगी दिली गेली आहे. त्याचा इथेही यापेक्षा काही वेगळा परिणाम दिसणार नाही. त्या भारतातील रिटेल क्षेत्र सहज उध्वस्त करतील.

## *रोजगार निर्मितीचे मिथक*

म्हणूनच हे बलाढ्य रिटेल विक्रेते रोजगार निर्माण करतील हे एक मिथकच आहे. काही हजार लोकांना ते नोकरीवर लावतील; पण जे लाखो रोजगार आणि दुकानदार उध्वस्त होतील, त्या तुलनेत नवीन नोकऱ्यांची संख्या नगण्य असेल. (यामध्ये लहान व्यापारी आणि शेतकऱ्यांवरचा त्यांचा परिणाम धरलेला नाही!) एका अंदाजानुसार वॉलमार्टचे एक स्टोअर १३०० लहान दुकाने बंद करू शकते आणि ३,९०० लोकांना बेरोजगार बनवू शकते. सुपरमार्केट मध्ये निर्माण झालेल्या प्रत्येक रोजगारामागे असंघटित रिटेल क्षेत्रातील १७ रोजगार नाहीसे होतील असा अंदाज आहे![48] भारतात ४ कोटी पेक्षा जास्त लोक रिटेल क्षेत्रात कार्यरत आहेत; त्यांच्या कुटुंबांचाही विचार केला तर १६ कोटी लोक या क्षेत्रावर आपल्या उपजीविकेसाठी



अवलंबून आहेत. यावरून लक्षात येते की बहुराष्ट्रीय रिटेल कंपन्यांच्या भारतातील प्रवेशानंतर भारतातील रोजगारावर अतिशय विनाशक परिणाम होईल.

ज्याकाही थोड्याफार नोकऱ्या या सुपरमार्केट्समध्ये मिळतील त्या सुद्धा अतिशय कमी वेतनाच्या असतील. वॉलमार्ट जागतिक मानदंडांपेक्षा कमी पगार देण्यासाठी कुख्यात आहे. तिच्या स्वत:च्या देशात, म्हणजे अमेरिकेतसुद्धा, हेच दिसून येते. वॉलमार्ट अमेरिकेत खाजगी क्षेत्रामध्ये सगळ्यात जास्त रोजगार देणारी कंपनी आहे. अमेरिकेच्या १४ कोटी कामगारांपैकी १४ लाख म्हणजे १% लोक वॉलमार्टमध्ये काम करतात.[49] वॉलमार्ट आपल्या कामगारांना 'सहकारी' म्हणवते पण वेतन मात्र दर तासाला फक्त ११.७५ डॉलर्स म्हणजे दरवर्षी २०,७७४ डॉलर्स देते (याला रुपयात मोजून बघू नका, कारण अमेरिकेत खर्चही डॉलर मध्येच होतो), जो अमेरिकेतील गरिबी रेषेच्या ६% नी कमी आहे. वॉलमार्ट ही जास्त लोकांना काम देत असल्याने, जेव्हा ती कोणत्याही शहरात मॉल उघडते, तेव्हा तिच्या कमी वेतनामुळे स्पर्धेत टिकण्यासाठी आसपासचे इतर दुकानदारही वेतनाचा दर कमी करतात.[50] यापेक्षा वाईट म्हणजे वॉलमार्ट अनेक प्रकारांनी कामगारांचे शोषण करते. जसे, जबरदस्ती ओव्हरटाईम करून घेणे, न मोजता जास्त काम करून घेणे, थोडी जरी चूक झाली तरी शिक्षा, बेकायदेशीर बाल मजुरी, बेकायदेशीर विनानोंदणी कामगार, स्त्री कामगारांसोबत भेदभाव आणि युनियन्स बनू न देणे.[51] या प्रकारच्या शोषणाचे इनाम म्हणून वॉलमार्टचा मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) मायकल ड्यूक याला दरवर्षी ३.५ कोटी डॉलर्स पगार मिळतो. म्हणजे त्याचा एक तासाचा पगार, एखाद्या कामगाराच्या वार्षिक पगाराइतका आहे![52]

अशा अनिर्बंध कंपन्यांना भारतात प्रवेश देण्याअगोदरच भारत सरकारने देशातील कामगार कायदे बदलणे चालू केले आहे. हे कायदे अशा कंपन्यांच्या कामगार–धोरणांना अनुरूप केले जात आहेत. यामध्ये 'हायर आणि फायर'ला परवानगी (कधीही कामावर ठेवणे आणि काढून टाकणे), अल्पमुदती कंत्राटी काम, नोकरीच्या सुविधांमध्ये कपात आणि ओव्हरटाईमचा वेळ वाढवणे याप्रकारचे बदल सामील आहेत.

रिटेलचे क्षेत्र हे कदाचित बेरोजगारी/अल्परोजगाराचे सर्वाधिक फसवे आणि महत्वाचे रूप आहे. वस्तुनिर्माण आणि शेतीक्षेत्रात रोजगाराची कमतरता पाहता, दारोदारी जाऊन वस्तू विकणे, हातगाडीवर वस्तू विकणे किंवा थोडे भांडवल असेल तर लहान दुकान टाकणे यासारखी कामे बेरोजगारांसाठी शेवटचा उपाय ठरतात. रिटेल क्षेत्रात थेट परकीय गुंतवणुकीला आमंत्रण दिल्यामुळे मुळातच गरिबी रेषेखाली राहणारे कोट्यवधी लोक अजूनच दैन्यावस्थेत ढकलले जातील.

# ४. शेतकऱ्यांना फायदा होईल काय?

जर शेतकऱ्यांचा फायदा होणार असता, तर अमेरिकेतील आणि युरोपातील शेतकऱ्यांना तरी व्हायला हवा होता ना! याउलट अमेरिकेमध्ये लहान शेतकऱ्यांना शेती उद्योगातील मोठे खेळाडू आणि बलाढ्य रिटेल कंपन्या यांनी नेस्तनाबूत करून टाकले आहे. आजच्या घडीला दहा लाखापेक्षा कमी अमेरिकन लोक शेती हा आपला व्यवसाय म्हणून सांगतात; १९५० मध्ये हा आकडा २.५ कोटी पेक्षा जास्त होता.[53] त्याचप्रमाणेच युरोपातही दर मिनिटाला एक शेतकरी शेती सोडतोय.

विकसित देशांमध्ये जर सरकारे शेतीला मोठ्या प्रमाणात अनुदाने देत नसती, तर आत्तापर्यंत तिथली शेतीव्यवस्था संपून गेली असती. ऑर्गनाईझेशन फॉर इकॉनॉमिक कोऑपरेशन एन्ड डेव्हलपमेंट (ओईसीडी), ही जगातील ३४ सर्वात विकसित देशांची संघटना आहे. तिने २०१० मध्ये दिलेल्या एका अहवालात म्हटले आहे की ओईसीडी देशांमध्ये शेतीमधील अनुदान २००८ मध्ये २१% ने वाढले आणि २००९ मध्ये ते २२% ने वाढले. फक्त २००९ मध्ये विकसित देशांनी १,२६० अब्ज रुपये इतके मोठे अनुदान त्यांच्या शेती क्षेत्राला दिले.[54]

### *खरेदी किंमती कमी करवण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांची हातमिळवणी*

विकसित देशांमधील कृषीक्षेत्रातील संकटाचे कारण समजणे सोपे आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या आकाराने विशाल असल्यामुळे त्या प्रक्रिया, व्यापार, रिटेल अशा संपूर्ण पुरवठा–साखळीवर आपले अधिपत्य प्रस्थापित करतात. याशिवाय, त्या आपापसात स्पर्धा करत नाहीत तर एकत्र येऊन शेतकऱ्यांकडून आणि इतर उत्पादकांकडून खरेदी करण्यासाठी आपल्या मर्जीप्रमाणे किंमती ठरवतात. कंपन्या देत असलेल्या दराने माल विकण्याशिवाय शेतकऱ्यांकडे दुसरा पर्यायच नसतो. या स्थितीचा फायदा घेऊन मोठ्या रिटेल कंपन्या शेतमालाची खरेदी किंमत पाडतात आणि शेतकऱ्यांना देशोधडीस लावतात. याच कारणामुळे अमेरिका आणि युरोपमध्ये कौटुंबिक शेती उध्वस्त झाली आहे.

काही उदाहरणे बघूयात. मोठ्या रिटेल कंपन्यांच्या मक्तेदारीचा शेतकऱ्यांवर होणारा परिणाम बघायचा असेल तर सुपरमार्केटमध्ये ग्राहकाने खर्च केलेल्या प्रत्येक डॉलर पैकी शेतकऱ्याला किती हिस्सा मिळतो हे पाहिले पाहिजे. १९७०मध्ये डुकरांची पैदास करणाऱ्या उत्पादकांना डुकराच्या मांसावर सुपरमार्केट्समध्ये खर्च केलेल्या प्रत्येक डॉलरपैकी ४८ सेंट (१ डॉलर = १०० सेंट) मिळत होते; तीन दशकांनंतर त्यांचा वाटा १२ सेंटवर आला होता. हे होत असताना, सुपरमार्केट्समधील किंमती मात्र स्थिर होत्या. म्हणजेच सुपरमार्केट्सनी सर्व नफा आपल्यासाठीच ठेवला होता आणि ग्राहकांनाही फायदा दिला नव्हता. ब्रिटन मध्ये



ग्राहकाला १.४५ पौंडाला २ लिटर दुध मिळते, पण शेतकऱ्याला फक्त ५८ पेन्स (४०%) मिळतात (१ पौंड = १०० पेन्स). रॉयल असोसिएशन ऑफ ब्रिटिश डेअरी फार्मर्सच्या मते दुग्ध व्यावसायिक दर २ लिटरमागे ३ पेन्सचा तोटा सहन करत आहेत. अनेक लहान शेतकऱ्यांनी तर यामुळे डेअरी उद्योगातून अंगच काढून घेतले आहे.[55]

एखादी रिटेल कंपनी जेवढी मोठी, तितकी ती पुरवठादारांना कमी किंमतीत माल विकायला लावू शकते. ब्रिटनमधील स्पर्धा आयोगाला असे आढळले की टेस्को ही ब्रिटनमधील सर्वात मोठी सुपरमार्केट कंपनी तिच्या पुरवठादारांना सरासरी बाजारभावाच्या ४% कमी किंमत देत होती, आणि इतर लहान सुपरमार्केट्स सरासरीच्या जास्त किंमत देत होते.[56]

विकसित देशांमध्ये लहान शेतकऱ्यांसाठी परिस्थिती इतकी अवघड झाली आहे की फेब्रुवारी २००८ मध्ये युरोपियन संसदेने जाहीर केले: "संपूर्ण युरोपियन युनियनमध्ये रिटेलचे क्षेत्र काही मूठभर सुपरमार्केट्सच्या प्रभावाखाली आहे ... संपूर्ण युरोपियन युनियनमधून मिळालेले पुरावे असे सांगतात की मोठ्या सुपरमार्केट साखळ्या त्यांची क्रयशक्ती वापरून पुरवठादारांना कमी किंमतीत माल विकायला भाग पाडत आहेत आणि त्यांच्यावर अन्याय्य अटी लादत आहेत."[57]

## तिसऱ्या जगातील शेतकऱ्यांची लूट

मोठ्या रिटेल कंपन्यांमुळे तिसऱ्या जगातील शेतकऱ्यांनाही काहीच फायदा झालेला नाही. एका दशका अगोदर तिसऱ्या जगातील कॉफी उत्पादक ३० अब्ज डॉलरच्या बाजारामध्ये १० अब्ज डॉलर कमावत होते. आता ते ६० अब्ज डॉलरच्या बाजारामध्ये फक्त ६ अब्ज डॉलर कमावतात. याप्रमाणेच घानामध्ये कोको उत्पादक शेतकऱ्यांना मिल्क–चॉकोलेटच्या किंमतीच्या फक्त ३.९% एवढेच मिळतात, पण रिटेलमधील नफा ३४.१% च्या आसपास आहे.[58] ब्रिटन मध्ये ग्राहकांनी केळ्यांवर खर्च केलेल्या प्रत्येक १ पौंड रकमेपैकी इक्वाडोर मधील शेतकऱ्यांना फक्त १.५ पेन्स मिळतात; तेव्हा ४० पेन्स सुपरमार्केटला जातात आणि बाकीची रक्कम मधल्या व्यापारी कंपन्यांना जाते.[59] आफ्रिकेतील शेतकऱ्यांना निर्यात केलेल्या सफरचंदाच्या किमतीच्या फक्त ९% वाटा मिळतो, पण ब्रिटनमधील रिटेल कंपन्यांना ४२% वाटा मिळतो.[60]

### *अन्याय्य अटी लादण्याचा प्रकार*

मोठ्या रिटेल कंपन्या लहान शेतकऱ्यांचे इतर मार्गांनीही शोषण करतात. उदाहरणार्थ, त्यांच्या मालावर अतिशय कडक नियम लादले जातात, बाजाराच्या गरजेप्रमाणे अगदी थोड्या कालावधीच्या सूचनेवर त्यांना उत्पादन कमी–जास्त

करावे लागते, शीतगृहांसारखी सोय करावी लागते, इ. याप्रकारचे नियम पाळायचे म्हणजे सिंचन, वाहतूक, साठवणुकीच्या सोयी, पॅकेजिंग यामध्ये मोठी गुंतवणूक लागते. कॉर्पोरेट ग्राहकांच्या मागण्या पुरवण्यासाठी लहान शेतकऱ्यांकडे एवढी मोठी गुंतवणूक करण्याची क्षमता नसते, त्यामुळे त्यांना शेतीमधून बाहेर पडण्यास भाग पाडले जात आहे आणि मोठे शेतकरी किंवा कंपन्याच खुद्द त्यांची जागा घेत आहेत.[61]

उदाहरणार्थ, ब्राझील मध्ये नेसले आणि परमलात (इटालियन बहुराष्ट्रीय कंपनी) या कंपन्यांनी अगोदर सर्व सहकारी दूध संस्था विकत घेतल्या. त्यानंतर त्यांनी लहान शेतकऱ्यांवर अशा अटी लावल्या की त्या पूर्ण करणे त्यांना शक्यच नव्हते. उदा. त्यांनी ही अट घातली की दुग्ध व्यावसायिकांनी शीतकरण यंत्र उभारावे. लहानात लहान टाकी १०० लिटरची असते, पण एक सामान्य शेतकरी रोज सरासरी ५० लिटर दूधाचे उत्पादन करत होता. बहुतेक लहान शेतकऱ्यांना शीतकरण यंत्र घेणे परवडले नाही. यामुळे दुग्ध व्यवसायातील जवळपास ५०,००० शेतकऱ्यांना या धंद्यातून बाहेर पडावे लागले.[62] याचप्रकारे अर्जेंटीनामध्ये सुद्धा दुग्ध व्यवसायातील पुरवठा साखळीचे कंपनीकरण झाल्यामुळे दूध व्यावसायिकांची संख्या १९८३ मधील ४०,००० वरून २००१ मध्ये १५,००० वर आली.[63] मेक्सिको मधील वॉलमार्टच्या प्रचंड वर्चस्वामुळे गेल्या दोन दशकात तिने १२.५ लाख शेतकऱ्यांना, म्हणजे देशातील २५% शेतकऱ्यांना, शेती सोडायला भाग पाडले आहे.[64]

ब्रिटनमधील स्पर्धा आयोगाने १९९९ मध्ये केलेल्या एका अभ्यासात हेच आढळून आले. त्यामध्ये त्यांना असे दिसून आले की, सुपरमार्केट्स आपल्या पुरवठादारांवर अनेक अटी लादत होते. यामध्ये अगदी सूट देण्यापासून पुरेशी सूचना न देता कराराच्या अटी बदलणे इत्यादी बाबी होत्या. याप्रकारच्या कार्यपद्धतीमुळे शेतकऱ्यांचे आणि कामगारांचे उत्पन्न खालावत होते.[65]

बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांच्या एकाधिकाराचा फायदा घेऊन लहान शेतकऱ्यांशी बेकायदेशीर पद्धतींनीही व्यवहार करतात. यामध्ये पैसे उशिरा चुकते करणे, शेवटच्या क्षणी किंमत कमी करणे, वायद्यापेक्षा कमी खरेदी करणे, अपारदर्शक पद्धतीने उत्पादनाचे वजन करणे, उधारीवर जास्त दराने व्याज आकारणे आणि पुरेशी सूचना न देता दर्जाचे मानदंड बदलणे या प्रकारांनी पिळवणूक केली जाते.[66]

## भारतातील लहान शेतकऱ्यांवर परिणाम

ह्या सगळ्या गोष्टी लक्षात घेता भारतातील खाद्यान्नाच्या रिटेल क्षेत्रात बलाढ्य कंपन्यांच्या प्रवेशामुळे भारतातील ६५ कोटी शेतकऱ्यांना देशोधडीला लावले जाईल हे नक्की.



सध्या एपीएमसी कायद्यामुळे शेतकऱ्याला कोणत्याही बाजारपेठेत (मंडी) जास्त किंमत देणाऱ्या कोणालाही आपला माल विकण्याचे स्वातंत्र्य आहे. एकच खरेदीदार नसल्यामुळे त्यांना तुलनेने चांगली किंमत मिळते. आता, केंद्र सरकार राज्य सरकारांवर त्यांचा एपीएमसी कायदा बदलण्यात यावा असा दबाव टाकत आहे, म्हणजे मोठमोठ्या कंपन्यांना शेतकऱ्यांकडून शेतमालाची थेट खरेदी करता येणे शक्य होईल.[67] ह्याचा परिणाम म्हणजे हळूहळू बाजार समित्या बंद होतील. याचे कारण म्हणजे या कंपन्यांची आर्थिक ताकद खूप असल्यामुळे त्या शेतकऱ्यांना सुरुवातीला स्थानिक मंडीपेक्षा चांगला भाव देतील (ज्या राज्यांमध्ये एपीएमसी कायदा बदलण्यात आला आहे, तिथे त्या हेच करत आहेत), आणि म्हणून येणाऱ्या वर्षांमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्या शेतमाल खरेदीवर मक्तेदारी प्रस्थापित करतील.

अगोदर सांगितल्याप्रमाणे बहुराष्ट्रीय कंपन्या एकमेकींसोबत किंमतीची स्पर्धा करत नाहीत. एक तर त्या हातमिळवणी करतील किंवा क्षेत्र वाटून घेतील. एकदा का स्थानिक बाजार बंद पडले आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांनी खरेदीवर मक्तेदारी स्थापित केली की मग कंपन्या खरेदीभाव उतरवणे चालू करतील, जसे त्यांनी जगभरात केले आहे. असे झाल्यावर शेतकऱ्यांपुढे या कंपन्यांना माल विकण्याशिवाय दुसरा पर्यायही उरलेला नसेल. याशिवाय शेतकऱ्यांवर दर्जा आणि वेळापत्रक पाळण्यासारखी कडक बंधने त्या घालतील. अशी बंधने आपल्याकडचे बटाटा आणि टॉमेटो सारखी पिकं घेणारे लहान शेतकरी पाळू शकणार नाहीत आणि इतर देशांप्रमाणेच आपल्याकडेही लहान शेतकरी उध्वस्त होतील.

पंतप्रधान मनमोहन सिंग आणि इतर 'शेतकऱ्यांचे मित्र' अजून एक दावा करत आहेत. ते सांगत आहेत की रिटेल मध्ये विदेशी गुंतवणूक आल्यामुळे आधुनिक साठवणुकीच्या सोय़ी तयार होतील आणि फळं, भाज्या यांची नासाडी कमी होईल, यातून शेतकऱ्यांना मदतच होईल. हा अतिशय पोरकट तर्क आहे. अशाप्रकारच्या सुविधा सार्वजनिक क्षेत्रात उभ्या करणे किंवा शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन सहकारी तत्वावर करून घेणे हे सरकारचे कर्तव्य आहे. विदेशी बहुराष्ट्रीय रिटेल कंपन्यांनी जर या सुविधा उभ्या केल्या, तर त्या स्वत:च्या फायद्यासाठीच असणार, शेतकऱ्यांसाठी निश्चितच नाही. बहुराष्ट्रीय कंपन्या काही समाजसेवक नाहीत!

मग सरकार स्वत: या सुविधा का नाही उभारत? शेतीक्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्या किंवा रिटेल क्षेत्रातील मोठमोठ्या कंपन्यांनी या सुविधा उभाराव्यात असा सरकारचा आग्रह का? उत्तर सरळ आहे. हा सर्व जागतिकीकरणाच्या क्रूर धोरणांचा भाग आहे (याबद्दल पुस्तिकेत पुढे चर्चा केली आहे). जागतिक बँक आणि भारताच्या परकीय कर्जदात्यांच्या वतीने भारतातील चापलूस राज्यकर्ते ही धोरणे राबवत आहेत. जागतिक कृषीव्यापार कंपन्या भारतातील कृषी क्षेत्रावर ताबा मिळवू पाहत आहेत आणि त्यामुळे त्या भारत सरकारवर कृषी क्षेत्रातील गुंतवणूक कमी

करण्यासाठी दबाव टाकत आहेत; भारत सरकारही त्याची कर्तव्यतत्परतेने अंमलबजावणी करत आहे.[68]

गेल्या दोन दशकांमध्ये 'शेतकऱ्यांना मदत करण्याच्या' नावाखाली सरकारने अर्थव्यवस्था खुली करून विदेशी गुंतवणुकीला जो मुक्त वाव दिला आहे, त्यामुळे शेतीक्षेत्रातले संकट खूपच गंभीर झाले आहे. परिणामी शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपण प्रचंड वाढले आहे आणि देशाच्या इतिहासात पहिल्यांदा शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची एक भयानक लाट आली आहे. याशिवाय ७५ लाख लोकांनी गेल्या दशकात शेती सोडली आहे.[69] या धोरणांचेच पुढील पाऊल म्हणजे किरकोळ क्षेत्रातील विदेशी गुंतवणुक तर अजूनच विध्वंसक ठरेल.

## ५. मोठ्या रिटेल मुळे लहान कंपन्याही नष्ट होतील

अगोदर चर्चा केल्याप्रमाणे आर्थिक ताकद प्रचंड असल्यामुळे वॉलमार्ट सारख्या मोठ्या रिटेल कंपन्या जगातील सर्वात कमी किंमतीत उत्पादन करणाऱ्या चीनसारख्या पुरवठादारांकडून माल विकत घेतात. उदाहरणार्थ – १९९५ मध्ये अमेरिकेतील वॉलमार्ट मध्ये विकल्या जाणाऱ्या ६% वस्तू आयात होत होत्या. हे प्रमाण २००५ पर्यंत ६०% झाले. हा माल जगातील ६३ देशांमधील ६००० पुरवठादारांकडून आयात केला जात होता.[70]

वॉलमार्टला भारतात येण्याची परवानगी दिल्यामुळे भारतीय उद्योगांना जगातील सर्वात स्वस्त सामानाशी स्पर्धा करावी लागेल. या स्पर्धेत भारतीय उद्योग टिकून राहिले तरी वॉलमार्ट जाणीवपूर्वक किंमती उतरवून त्यांना धंद्यातून उठवू शकते, कारण तिच्याकडे तोटा सहन करण्याची आर्थिक ताकद आहे. उदा. परमलात कंपनी, जी जगातील मोठी दुग्धउत्पादक आहे, जेव्हा दक्षिण आफ्रिकेमध्ये ९० च्या दशकात घुसली, तेव्हा तिने दुग्ध उत्पादने कमी दरात रिटेल दुकानदारांना दिली. परिणामी स्थानिक प्रक्रिया करणारे आणि वितरणकर्ते यांचे प्रचंड नुकसान झाले आणि अनेकांना व्यवसाय बंद करावा लागला.[71] भारतातही वॉलमार्ट आल्यानंतर लहान कंपन्या बंद पडतील.

### कामगारांचे शोषण

वॉलमार्ट एवढी बलाढ्य आहे आणि पुरवठादारांकडून एवढ्या मोठ्या प्रमाणात माल खरेदी करते की त्यामुळे ती त्यांच्यावर अटी लादून अजूनच किंमती कमी करायला भाग पाडते, ज्यामुळे पुरवठा करणाऱ्या देशातील कामगारांची स्थिती अजून वाईट होते.

धंद्यात नीतिनियम नसतात. ज्या देशांमध्ये बालमजूरी चालते, वेठबिगारी चालते, मानवाधिकारांचे हनन होते अशा देशांमधूनही माल विकत घ्यायला



वॉलमार्टला काहीही अडचण नसते. होंडुरास देशामध्ये वॉलमार्टचे कामगार १४ तासांच्या पाळीमध्ये आठवड्यात ८८ तास काम करतात आणि तासाला ४३ सेंट कमावतात, ज्यामध्ये जिवंत राहाणेही कठीण आहे. वॉलमार्ट मध्ये विकले जाणारे कपडे बहुतांशी बांग्लादेशातील तरुण महिला बनवतात, ज्यांना सकाळी ७ ते रात्री ८ वाजेपर्यंत, आठवड्यातील सातही दिवस काम करावे लागते आणि तासाला फक्त ९ ते २० सेंट कमाई होते. त्यांना आरोग्यसुविधा आणि मातृत्व रजाही मिळत नाही, स्वच्छतागृहाच्या भेटीही मोजल्या जातात आणि हक्क मागितले तर लगेच कामावरून काढूनही टाकले जाते.[72] याप्रकारची कामाची भयावह परिस्थिती असूनही, अमेरिकेत विकल्या जाणाऱ्या एका शर्टच्या किंमतीच्या फक्त दीड टक्के रक्कम बांगलादेशच्या कामगारांना मिळते तर वॉलमार्टला ७२% मिळतात.[73]

वॉलमार्ट चीनमधून मोठ्या प्रमाणात खरेदी करते कारण तिथे सरकारने कामगारांच्या युनियन्सवर बंदी घातली आहे; जो कोणी कामगारांचे आंदोलन उभे करण्याचा प्रयत्न करतो त्याला सरकार अतिशय कडक शिक्षा करते आणि तिथली न्यायालये आणि इतर नियामक मंडळेही कामगार कायद्याच्या उल्लंघनाकडे दुर्लक्ष करायला तयार असतात. यामुळेच वॉलमार्ट कमीत कमी किंमतीत माल घेण्यासाठी विविध पुरवठादारांमध्ये स्पर्धा लावते. परिणामी कामगारांना कमी पगार, कामाचे जास्त तास आणि कामाच्या ठिकाणच्या हलाखीच्या परिस्थितीत काम करावे लागते. चीनमधील कारखाने १६ वर्षाखालील (चीनमधील कामाचे कायदेशीर वय) मुलांनाही कामावर ठेवतात, दिवसाला १५ तास आणि आठवड्याचे सातही दिवस काम करायला लावतात, धोकादायक यंत्रांमध्ये आणि विषारी रसायनांमध्ये त्यांना काम करायला लावतात.[74]

थोडक्यात, एकदा का वॉलमार्ट आणि इतर मोठ्या रिटेल कंपन्यांचे मॉल्स भारतात चालू झाले की भारतातील कामगारांना अशाप्रकारच्या कमी पगारामध्ये काम करणाऱ्या कामगारांशी स्पर्धा करावी लागेल. ही स्पर्धा अर्थातच कमी वेतन आणि कमी सुविधांसाठी असणार आहे!

## ६. ग्राहकांना फायदा होईल काय?

सुपरमार्केट्स मुळे मधले दलाल कमी होतील आणि त्यामुळे ग्राहकांना कमी किंमतीत वस्तू विकत मिळतील असा प्रचार चालू आहे. हे अजून एक मिथक आहे. वस्तुस्थिती ही आहे की रिटेल कंपन्या शेतकऱ्यापासून ते ग्राहकांपर्यंतची संपूर्ण पुरवठा–साखळीच ताब्यात घेतात म्हणजेच त्या उत्पादक, घाऊक विक्रेते, वितरक आणि रिटेलर असे सर्व एकाचवेळी बनतात. याप्रकारे या कंपन्या स्वत:च खूप मोठ्या दलाल म्हणून पुढे येतात. एकदा यात यशस्वी झाल्यावर या कंपन्या त्यांच्या नफ्याचा हिस्सा ग्राहकांना का देतील आणि किंमती कमी का करतील?

याउलट आपल्या एकाधिकाराचा फायदा घेऊन, वर चर्चा केल्याप्रमाणे, बहुराष्ट्रीय कंपन्या किंमती चढ्याच ठेवून गडगंज नफा कमवतात. सुरुवातीला लहान दुकानदारांचा धंदा बंद पडेपर्यंत ग्राहकांना कमी किंमतीचा फायदा होऊ शकतो, पण एकदा बाजारावर या कंपन्यांची मक्तेदारी प्रस्थापित झाली, की मग त्या किंमती वाढवू लागतात. जेव्हा पुरवठादारांकडून किंमती कमी होतात, तेव्हाही या कंपन्या ग्राहकांना मिळणारी किंमत कमी करत नाहीत आणि प्रचंड नफा कमावतात. सर्व जगामध्ये हाच अनुभव आला आहे. निकारागुआ व अर्जेंटीना ते केनिया आणि थायलंड ते व्हिएतनाम, या सर्व देशांमध्ये सुपरमार्केट्समधील किंमती पारंपरिक बाजाराच्या तुलनेत १०–१४ टक्के जास्त आहेत.[75]

गेल्या वर्षी (२०११) जून मध्ये फ्रान्स सरकारच्या अन्न किंमतींवर लक्ष ठेवणाऱ्या समितीने एका शासकीय अहवालात हेच सांगितले आहे: सुपरमार्केट्स शेतकऱ्यांना कमी किंमती देतात पण त्याचा फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचवत नाहीत, ज्यामुळे या कंपन्यांचा सफरचंद आणि केळ्यांवरच्या नफ्याचा दर १४०% च्या आसपास आहे, आणि गाजर व लेट्यूसवरच्या नफ्याचा दर ११०% आहे. फक्त एका दशकामध्ये डुकराच्या मांसावरचा नफ्याचा दर ३९% वरून ५५% झाला आहे.[76] शेतमालाच्या किंमती कमी झाल्याचा फायदा ग्राहकांना दिला जात नाही, ही बाब ब्रिटनमधील नॅशनल फार्मर्स युनियन (राष्ट्रीय शेतकरी संघ) यांनाही आढळली. उदा. ९०च्या दशकात दूध आणि मेंढीच्या मांसामध्ये उत्पादकांना मिळणाऱ्या किंमतीत मोठी घट झाली, पण त्यामुळे रिटेल किंमती काही कमी झाल्या नाहीत.[77] अमेरिकेमध्ये १९९४ ते २००४ या काळात टोमॅटो उत्पादकांना मिळणारी किंमत २५% ने कमी झाली पण सुपरमार्केट्सनी किंमती ४६% नी वाढवल्या.[78]

भारतातील चहाच्या मळ्यांमध्येही हेच घडताना दिसून येते. 'एक्शन एड' या आंतरराष्ट्रीय एनजीओ ने केलेल्या एका अभ्यासात असे दिसून आले की मोठमोठ्या कंपन्यांच्या वतीने खरेदी करणाऱ्या कंपन्यांनी एकमेकींशी हातमिळवणी केली आणि चहाची खरेदी किंमत खाली पाडली. परिणामी दक्षिण भारतातील चहाच्या लिलावाच्या किंमती १९९८ मधील रु.६९ प्रती किलोवरून २००४ मध्ये रु.४६ प्रति किलोवर आल्या, म्हणजे ३३% कमी. याचवेळी चहाच्या किंमती उत्तर भारतात १२% नी कमी झाल्या. खरेतर ही किंमत उत्पादनाच्या किंमतीपेक्षाही (२००४ मध्ये प्रतिकिलो रु.७५) कमी झालेली होती. यामुळे लहान चहा शेतकऱ्यांवर आणि कामगारांवर अतिशय वाईट परिणाम झाले. परंतु ग्राहकांना रिटेल मध्ये तोच चहा रु.१६० एवढ्या जास्त किंमतीला विकला गेला आणि चहा विकणाऱ्या हिंदुस्तान लिव्हर सारख्या मोठ्या कंपन्या मात्र गब्बर झाल्या. हिंदुस्तान लिव्हरचा भारतीय बाजारातील चहाचा वाटा ३४% आहे. तिने भागधारकांना वाटलेल्या डिव्हिडंड मध्ये १९९६ पासून चारपट वाढ झाली आहे.[79]



# ७. रिटेल मध्ये विदेशी गुंतवणूक: कोणाच्या हितासाठी?

किरकोळ विक्री क्षेत्रामध्ये विदेशी गुंतवणुकीला दिलेल्या परवानगीमुळे भारतातील रिटेलच्या क्षेत्रावर अतिशय विपरीत परिणाम होतील हे स्पष्टच आहे. लाखो लहान दुकानदार, पथारीवाले आणि हातगाडीवाले धंद्यातून बाहेर फेकले जातील आणि अनेक पटींनी बेरोजगारी वाढेल. एवढेच नाही तर गेल्या दोन दशकांमध्ये अर्थव्यवस्था खुली केल्यामुळे जे अगोदरच संकटात आहेत, त्या लहान व्यापारी आणि शेतकऱ्यांवरही याचे विध्वंसक परिणाम होतील. शिवाय ग्राहकांनाही फायदा होणार नाही. रिटेल मधील विदेशी गुंतवणुकीमुळे महागाईवर नियंत्रण येईल आणि महागाईवर ताबा मिळवता येईल हे फक्त दिवास्वप्न आहे.

जर इतके सगळे विनाशकारी परिणाम आहेत, तर मग भारत सरकारने बलाढ्य विदेशी रिटेल कंपन्यांना भारतात परवानगी का दिली आहे? विदेशी कंपन्यांचे भले व्हावे म्हणून भारतातील जनतेचे हित विकण्यासाठी इथले राज्यकर्ते इतके उत्सुक का आहेत?

## जागतिकीकरण: भारत विक्रीस

खरे तर गेली दोन दशके असेच चालू आहे. १९९१ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था विदेशी कर्जाच्या सापळ्यात अडकली होती. परिस्थितीचा फायदा घेऊन भारताचे परकीय कर्जदाते म्हणजेच अमेरिका आणि इतर विकसित देश – ज्यांना साम्राज्यवादी देश म्हटले जाते – यांनी भारत सरकारवर आपल्या अटी लादण्यास सुरुवात केली. त्यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थांद्वारे भारत सरकारचा हात पिरगाळून अर्थव्यवस्थेत बदल करायला भाग पाडले. या तथाकथित 'आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमात' खालील अटी होत्या:

- ✓ आयातीला खुली सूट आणि निर्यातभिमुख उत्पादनाला प्रोत्साहन देणे;
- ✓ अर्थव्यवस्थेच्या सर्व भागांमध्ये विदेशी गुंतवणुकीवर असलेले सर्व निर्बंध काढून टाकणे;
- ✓ जनतेच्या हितासाठी असलेल्या सुविधांसकट सर्व सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण;
- ✓ पिण्याचे पाणी, अन्न, शिक्षण आणि आरोग्य अशा अत्यावश्यक सेवांसकट सर्व क्षेत्रांमध्ये नफेखोरीवर असलेले निर्बंध काढून टाकणे.

भारताच्या विदेशी कर्जदात्यांच्या अटींवर झालेल्या ह्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमालाच 'जागतिकीकरण' असे गोंडस नाव देण्यात आले. तेव्हापासून आजपर्यंत आलटून पालटून सर्व पक्ष केंद्रात वा राज्यात सत्तेवर येऊन गेले, पण

जागतिकीकरणाचे धोरण मात्र पंख पसरत आहे.

जागतिकीकरणाचे सार असे की सरकार आता अर्थव्यवस्था फक्त महाकाय कंपन्यांच्या आणि त्यांचे लहान भागीदार भारतीय मोठ्या कंपन्यांच्या नफेखोरीसाठीच चालवते. या कॉर्पोरेशन्सच्या लुटीला आता काहीच सीमा नाही. ते आता डोंगर, जंगले, नद्या, जमिनी व त्यामधील अफाट नैसर्गिक संपदा अक्षरश: लुटून नेत आहेत. सरकारने त्यांना हजारो एकर जमिनीचा ताबा घेण्याची परवानगी दिली आहे. सामान्य लोकांच्या घामाच्या कमाईतून उभ्या राहिलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या, बँका आणि विमा कंपन्या कवडीमोल किंमतीत त्यांना बहाल केल्या जात आहेत. खाजगीकरणामुळे आता शिक्षण, आरोग्य, वीज, वाहतूक, एवढेच नाही तर पिण्याच्या पाण्यासारख्या सेवाही फक्त नग्न नफेखोरीसाठी त्यांच्या ताब्यात दिल्या जात आहेत. या सर्व सेवा अत्यावश्यक सेवा असल्यामुळे, त्यात प्रचंड नफा आहे.

भारत सरकारने आता देशाच्या भविष्याची चिंता करणे सोडून दिले आहे; आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी पर्यावरणाचे जतन करण्याची चिंता करणे सोडून दिले आहे; देशातील जनतेच्या उदरनिर्वाहाची चिंता करणे सोडून दिले आहे; अन्न, पाणी, आरोग्य आणि शिक्षणासारख्या आवश्यक सेवा कमी दरात उपलब्ध करुन देण्याची – जेणेकरून ते एक चांगले आयुष्य जगू शकतील आणि त्यांच्या क्षमता पूर्णपणे विकसित करू शकतील – चिंता करणेही सोडून दिले आहे. त्यांना आता चिंता आहे ती फक्त बहुराष्ट्रीय कंपन्यांना आणि त्यांच्या भारतीय हस्तकांना – देशी बडे भांडवलदार – अवाढव्य नफ्यांसाठी उत्तम गुंतवणुकीच्या संधी उपलब्ध करून देण्याची.

## रिटेल मध्ये विदेशी गुंतवणूक: जागतिकीकरणाचेच पुढचे पाऊल

दोन दशकांच्या जागतिकीकरणाने भारतीय अर्थव्यवस्थेला विदेशी सावकारांची अजूनच बटिक बनवले आहे. जागतिकीकरणाच्या अटींमुळे भारताचे परकीय चलनाचे संकट अधिक गंभीर झाले आहे. आयातीचे उदारीकरण केल्यामुळे आपल्या व्यापार तुटीत मोठी वाढ झाली आहे. १९९१–९२ मधील २.८ अब्ज डॉलर्स वरून ही तूट २०११–१२ मध्ये १८९.७ अब्ज डॉलर्स इतकी मोठी झाली आहे. याचा परिणाम म्हणून, २०११–१२ मध्ये आपली चालू खात्यातील तूट ७८.२ अब्ज डॉलर्स झाली आहे, म्हणजे १९९१ नंतर सर्वात जास्त. याबरोबरच मार्च २०१२ मध्ये आपले विदेशी कर्ज ३४६ अब्ज डॉलर्सवर पोहोचले आहे, म्हणजे १९९१ च्या तुलनेत विदेशी कर्ज चार पटीने वाढले आहे.[80]

विदेशी कर्जाच्या या दुष्टचक्रामुळे परकीय चलनाची दिवाळखोरी टाळण्यासाठी आपली अर्थव्यवस्था विदेशी थेट गुंतवणुकीवर अधिकाधिक अवलंबून आहे. यामुळेच



विदेशी कॉर्पोरेट फौजा आणि त्यांची बटिक सरकारे आपल्या देशाचा सन्मान आणि प्रतिष्ठा येताजाता तुडवत असतात; अजून आर्थिक सुधारणा राबवण्यासाठी आपल्यावर सतत दबाव टाकून असतात; बलाढ्य कंपन्यांच्या गुंतवणुकीसाठी व लुटीसाठी अर्थव्यवस्थेची अजून नवी क्षेत्रे खुली करण्यात यावी यासाठी दबाव टाकत असतात ... स्वातंत्र्य मिळून अर्धशतक उलटले नाही तोच आपण ते गमावण्याच्या वाटेवर आहोत.

रिटेल मध्ये विदेशी गुंतवणुकीला परवानगी म्हणजे याच धोरणांचे पुढचे पाऊल आहे. वॉलमार्ट, टेस्को, कॅरेफोर, मेट्रो यासारख्या मोठमोठ्या रिटेल कंपन्यांना आपल्या मायदेशामध्ये आता बाजारात वाढीला वाव उरलेला नाही, त्यामुळे त्या इतर कुरणे शोधताहेत. याशिवाय त्यांच्या स्वत:च्या देशांमध्ये स्थानिक लोकांवर त्यांनी जो विपरित परिणाम घडवला आहे, त्यामुळे विरोधही वाढतो आहे. म्हणून त्यांना भारतात यायचे आहे आणि त्याकरिता त्यांनी भारत सरकारवर अर्थव्यवस्था खुली करण्यासाठी दबाव टाकला.

ऐतखाऊ भारतीय उच्चभ्रू वर्ग जागतिकीकरणाबद्दल भलताच उत्तेजित झाला आहे. देशातील भांडवलशहांना अर्थव्यवस्थेच्या दूरगामी वाढीबद्दल यत्किंचितही काळजी उरलेली नाही, याउलट त्यांना फक्त विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांचे लहान भागीदार बनून नफा वाढवण्यातच रस आहे. ऐषोआरामात जगणाऱ्या उच्चभ्रू वर्गाला तर विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आगमनाने आकाश ठेंगणे झाले आहे कारण जगभरातील चैनीच्या, उपभोगाच्या वस्तू आता भारतीय बाजारात उपलब्ध आहेत. त्यामुळे रिटेल मध्ये विदेशी गुंतवणूक यावी ही भारतातील उच्चभ्रू वर्गाची सुद्धा मागणी होती. त्यांची चाकरी करण्यात धन्यता मानणाऱ्या बुध्दिजीवी वर्गाने मोठा प्रचार चालवला की किरकोळ क्षेत्रामधील विदेशी गुंतवणुकीमुळे भारतातील लोकांचा आणि अर्थव्यवस्थेचा फायदा होईल, किंमती कमी होतील, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल, वगैरे, वगैरे.

खरेतर भारतातील प्रमुख राजकीय पक्ष देशातील उच्चभ्रू वर्गाचेच प्रतिनिधित्व करतात. वाढता विदेशी दबाव, दिवसेंदिवस गंभीर होत चाललेले परकीय चलनाचे संकट आणि देशातील उच्चभ्रू वर्गाच्या मागणीमुळे भारत सरकारने शेवटी देशभरात चालू असलेल्या विरोधाकडे दुर्लक्ष करून रिटेल मधील विदेशी गुंतवणुकीला परवानगी दिली आहे.

## लढा चालूच ठेवलाच पाहिजे!

मित्रहो, आपल्या देशभरातील संघर्षानंतरही भारतातील राज्यकर्त्या वर्गाने आपली धोरणे पुढे ढकलली आहेत आणि किरकोळ क्षेत्रामध्ये विदेशी गुंतवणुकीला मान्यता दिली आहे.

अजून आपल्याला खूप काही करायला हवे आहे हे तर स्पष्टच आहे. आपल्याला आपला लढा तीव्र करावाच लागेल. आपल्यातले अनेक जण आज निराश झाले आहेत. एक सर्वसाधारण समज हा दिसून येतो की जर विरोधी पक्ष या धोरणाला थांबवू शकले नाहीत तर आपण सामान्य लोक कसे थांबवू शकतो? यामध्ये आपल्याला हे समजून घ्यावे लागेल की मुख्य विरोधी पक्षांचा विरोध हा फक्त लोकांच्या रागाचा फायदा घेण्याचा संधीसाधूपणा होता. त्यामुळेच त्यांनी या धोरणाच्या विरोधात एका निग्रही लढ्यासाठी मोठ्या प्रमाणात लोक रस्त्यावर यावेत असा प्रयत्न केला नाही, आणि फक्त कर्मकांड म्हणून एक दिवसाचा भारत बंद पाळण्याची घोषणा केली. हे अगोदर सुद्धा झाले आहे. गेल्या दोन दशकात विविध पक्षांच्या विविध आघाड्यांची सरकारे केंद्रात सत्तेवर येऊन गेली आहेत. जेव्हा जेव्हा सत्ताधारी आघाडीने आर्थिक सुधारणा राबवल्या आहेत, त्यांना तेव्हाच्या विरोधी पक्षांनी विरोध केला आहे. परंतु हेच विरोधी पक्ष जेव्हा सत्तेत आले तेव्हा त्यांनीही आर्थिक सुधारणांना जोमाने पुढेच नेले आहे. खरेतर जागतिकीकरणाच्या धोरणाबाबत भारतातील सर्व सत्ताधारी वर्गाचे आणि पक्षांचे एकमत आहे!

आपल्याकडे अतिशय कर्तुत्ववान थोर पुढारी नाहीत म्हणून निराश होण्याची गरज नाही. नेते आकाशातून जन्माला येत नाहीत; सामाजिक चळवळीच नेत्यांना जन्म देतात. सर्वात मोठी आणि उंच झाडंही शेवटी मातीतूनच अंकुरतात.

आपल्याला आपला लढा अजून तीव्र करण्याची, आणखीन लोकांना यात सामील करून घेण्याची गरज आहे. सरकारच्या आणि प्रसारमाध्यमांच्या प्रचारामुळे मोठ्या संख्येने सामान्य लोकांना असे वाटते की या धोरणामुळे भारतातील शेतकरी आणि ग्राहकांना फायदा होईल. त्यामुळेच या धोरणाच्या भयावह परिणामांबद्दल सामान्य माणसाला जागृत करण्याच्या आपल्या अभियानाला पुढे न्यावेच लागेल.

केवळ लोकांना जागृत करून चालणार नाही तर सर्जनशील पद्धतीने लोकांना संघटित करून या अन्यायकारक धोरणांच्या विरोधात आवाज उठवावा लागेल.

रिटेल मधील विदेशी गुंतवणुकी विरोधातील आपला हा लढा जागतिकीकरणाविरुद्ध देशव्यापी चळवळीचा भागच आहे. देशाला परकीय नफेखोर कंपन्यांच्या ताब्यात देणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या विरोधात हा लढा आहे. जसे नवीन लोक या संघर्षात सामील होतील तसतशी ही चळवळ देश बदलणारी शक्ती बनत जाईल आणि नवा भारत निर्माण करेल. असा भारत जिथे उत्पादन मूठभरांच्या फायद्यासाठी न होता सर्वसामान्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी होईल, जिथे सगळ्यांसाठी पोषक अन्न, चांगली आरोग्यसेवा, उत्साहवर्धक शिक्षण, चांगलं घर, म्हातारपणाची सुरक्षितता, प्रदूषण विरहित वातावरण हे सर्व असेल.

मित्रहो, हे स्वप्न नाही. आपली सगळ्यांची एकत्रित ताकद खूप आहे. ती जर



कामाला लावली तर ह्या धरतीवर आपण स्वर्ग उभारू शकू. आम्ही परत सांगतो हे स्वप्न नाही. हो, मान्य आहे की हे स्वप्न जर सत्यात उतरवायचे असेल तर ते सोप्प नाही. पण अशक्यही नाही. त्यासाठी आपल्याला एकत्र यायला लागेल. जग बदलण्याची लढाई लढावी लागेल.

प्रत्येक शेवटाला एक सुरूवात असते. आपण जर सुरुवात केली तरच शेवट होईल; चला आपण आपल्या छोट्या छोट्या प्रयत्नांनी सुरुवात करूया. चला, आपल्या शहरातील आणि आजूबाजूच्या भागातील लहान व्यापारी, शेतकरी आणि ग्राहकांची एकजूट बांधण्याचा प्रयत्न करूयात...

## संदर्भ व टीपा

[1] Rajinder Puri, “Did Walmart bribe Indian politicians?”, *The Statesman*, Dec 12, 2012, http://www.asianewsnet.net; Venky Vembu, "From Enron to Wal-Mart: the dirty business of ‘lobbying’”, Dec 11, 2012, http://www.firstpost.com

[2] Deepal Jayasekera, “Indian government puts retail sector restructure on hold”, Dec 8, 2011, http://www.wsws.org

[3] “Retail FDI on hold, India Inc unhappy”, Dec 6, 2011, http://info.shine.com

[4] “Microsoft ‘disappointed’ with hold back on retail FDI”, Dec 9, 2011, http://businesstoday.intoday.in

[5] Mayur Shetty, “Standard & Poor's warns India of a downgrade to junk category”, *TNN*, Jun 11, 2012, http://timesofindia.indiatimes.com; Amol Sharma, Sudeep Jain, “India Gets Downgrade Warning”, April 25, 2012, http://online.wsj.com

[6] “Fitch downgrades India's credit rating from stable to negative”, June 19, 2012, http://indiatoday.intoday.in; “PM concerned over Moody's forcast on economy”, *PTI*, Aug 11, 2012, http://www.hindustantimes.com

[7] “Time magazine dubs Manmohan Singh as 'underachiever'”, *PTI*, Jul 8, 2012, http://articles.timesofindia.indiatimes.com

[8] “After Time, Washington Post calls PM Manmohan Singh a "tragic figure"”, Sept 5, 2012, http://indiatoday.intoday.in

[9] “In India's interest to improve business climate to attract more FDI: US official”, *PTI*, Feb 20, 2012, http://articles.economictimes.indiatimes.com; “UK wants India to open retail, raise FDI limit in defence”, *PTI*, Jan 14, 2011, http://articles.economictimes.indiatimes.com; “India to go ahead with FDI in multi-brand retail: Minister”, July 27, 2012, http://www.fibre2fashion.com

[10] "Investment climate in India deteriorating, time to make difficult reforms: Barack Obama”, *PTI*, July 15, 2012, http://www.ndtv.com

[11] “Youth Congress meet: PM and Sonia vow to bring Lokpal, defend FDI”, *India Today*, November 29, 2011, http://indiatoday.intoday.in

[12] “FDI in multi-brand retail will create 10 million jobs: Anand Sharma”, *The Times of India*, Nov 26, 2011, http://timesofindia.indiatimes.com

[13] “High net worth individuals in India up 51% in 2009”, *Financial Express*, Jun 24, 2010, http://www.financialexpress.com

[14] Amit Sengupta, “So, where have all the poor gone?”, *Hardnews*, Jan 2010,

http://www.hardnewsmedia.com; Utsa Patnaik, "Trends in Urban Poverty under Economic Reforms: 1993-94 to 2004-05", http://www.indiaenvironmentportal.org.in

[15] Neeraj Jain, *India Becoming a Colony Again*, pp. 54-57, Lokayat publication, Pune, available online at www.lokayat.org.in

[16] The figure of $400 billion is cited in numerous newsreports. See for example: "FDI in India: Just 4 percent of India's retail is organised," *The Times of India*, Nov 30, 2011, http://timesofindia.indiatimes.com; "FDI in retail: Only 4 percent is organised, says CII", *Business Today*, Nov 30, 2011, http://businesstoday.intoday.in. This is probably based on the Business Monitor International (a renowned multinational credit risk and political risk rating agency) *India Retail Report* for the second-quarter of 2011, which says that total retail sales in India was $395.96 billion in 2011. The 2011 edition of *Global Retail Development Index* (GRDI) published by AT Kearney, the well-known international management consultancy firm, puts the size of India's retail market at $435 billion, while the international financial conglomerate Citigroup in its *India Microscope* report estimates its size at $470 billion.

[17] Most newsreports and articles cite this figure. This probably comes from the National Sample Survey Organisation's survey of employment and unemployment in 2009-10, according to which the service sector category that includes the wholesale and retail trade (besides the much smaller segment of repair works for automobiles and personal and household goods) provided jobs for 44 million people in the total workforce of 459 million. (C. P. Chandrasekhar, "Retreat on retail", *Frontline*, Dec. 17-30, 2011, http://www.frontlineonnet.com)

[18] Neeraj Jain, *India Becoming a Colony Again*, pp. 54-57, op. cit.

[19] *India in Business: Industry & Services*, Ministry of External Affairs, Govt of India, http://www.indiainbusiness.nic.in

[20] Mathew Joseph, et. al., *Impact of Organized Retailing on the Unorganized Sector*, Indian Council for Research on International Economic Relations, May 2008, p. vi, http://dipp.nic.in

[21] *GRDI 2011*, AT Kearney, http://www.slideshare.net

[22] Mathew Joseph, et. al., *Impact of Organized Retailing on the Unorganized Sector*, op. cit.; "120 million square feet mall space by Q1, 2011: Malls of India report", Sep 16, 2009, http://www.indiaretailing.com; "India Organised Retail Market 2010", Knight Frank India, http://online.wsj.com

[23] "Multinational Corporations: A Key to Global Poverty Reduction", Jan 9, 2006, http://www.globalenvision.org

[24] J. B. Foster, et. al., "Monopoly and Competition in Twenty-First Century Capitalism", *Monthly Review*, April 2011, http://monthlyreview.org

[25] J. B. Foster, et. al., "The Internationalization of Monopoly Capital", *Monthly Review*, June 2011, http://monthlyreview.org

[26] *Oligopoly, Inc. 2005*, Communique, ETC Group, Nov-Dec 2005, http://www.etcgroup.org

[27] J. B. Foster, et. al., "The Internationalization of Monopoly Capital", op. cit.

[28] J. B. Foster, et. al., "Monopoly and Competition in Twenty-First Century Capitalism", op. cit.

[29] Andy Coghlan and Debora MacKenzie, "Revealed — the capitalist network that runs the world", *New Scientist*, Oct 24, 2011, http://www.newscientist.com

[30] For more on this theory, see References nos. 24 and 25.



[31] For more on this theory, see: Paul Baran and Paul Sweezy, *Monopoly Capital*, K. P. Bagchi and Company, Calcutta 1994

[32] "Global Retailing - International retail factsheet", IGD, Jun 3, 2010, http://www.igd.com

[33] Peter S. Goodman and Philip P. Pan, "Chinese Workers Pay for Walmart's Low Prices", Washington Post Foreign Service, Feb 8, 2004, http://www.washingtonpost.com

[34] APMC or Agricultural Produce Market Committee: a marketing board established by state governments in India, in order to facilitate farmers to sell their produce to traders/agents and get reasonable prices

[35] J. B. Foster, et. al., "Monopoly and Competition in Twenty-First Century Capitalism", op. cit.

[36] Vijay Prashad, "Shop and awe", *Frontline*, Dec. 17-30, 2011, http://www.frontlineonnet.com

[37] Kenneth E. Stone, "Impact of the Walmart Phenomenon on Rural Communities", Published in Proceedings: *Increasing Understanding of Public Problems and Policies—1997*, Farm Foundation, Chicago, USA, http://www2.econ.iastate.edu

[38] There are several articles and reports on this on the internet. See for example: "Shameless: How Walmart Bullies Its Way Into Communities Across America", *Walmart Watch Report*, 2005, http://www.maine.com; "Walmart's expansion fight now rests with Gov. Brown", *Los Angeles Times*, Sept 3, 2011, http://articles.latimes.com; "Walmart fight heats up in California", *Christian Science Monitor*, June 19, 2007, http://www.csmonitor.com; Robert Smith, "New York City Officials To Walmart: Keep Out", *NPR*, Feb 4, 2011, http://www.npr.org

[39] "Supermarkets fed up with Sunday shopping rules", *Dutch News*, July 5, 2011, http://www.dutchnews.nl; Mark Faithfull, "Europe still divided by Sunday Shopping Conundrum", April 2006, http://www.icsc.org

[40] Horst Raff and Nicolas Schmitt, "Imports and the structure of retail markets", June 2011, p. 2, http://econstor.eu; "Liberalisation set to revolutionise French retailing", *Data Monitor*, April 9, 2008, http://about.datamonitor.com; Ken Baar, "Legislative Tools for Preserving Town Centres and Halting the Spread of Hypermarkets and Malls Outside of Cities", Institute for Transport and Development Policy, New York, USA, www.itdp.org

[41] *The grocery market*, Office of Fair Trading, May 2006, http://www.oft.gov.uk; Shekhar Swamy, "How the world burnt its fingers", *The Hindu Business Line*, Aug 25, 2011, http://www.thehindubusinessline.com

[42] "Tesco Plc: Overview", Sept 2004, http://www.corporatewatch.org

[43] Leonardo Iacovone, et. al., "Walmart in Mexico: The Impact of FDI on Innovation and Industry Productivity", Jan 2009, http://spot.colorado.edu

[44] "A Case Analysis Of The Wal-Mart De Mexico", http://www.otherpapers.com; Di Gregorio, et. al., "Competition between Emerging Market and Multinational Firms: Wal-Mart and Mexican Retailers", http://www.allbusiness.com

[45] Nivedita Menon, "Indian Government's Claims About Corporate Retail and the Reality: Shankar Gopalakrishnan", *Kafila*, November 30, 2011, http://kafila.org/2011

[46] C. P. Chandrasekhar, "Experience so far", op. cit.

[47] "Indonesia will have zoning to restrict big retail chains", *India Retailing*, Dec 28, 2007, http://www.indiaretailing.com; Mohan Guruswamy, Kamal Sharma, *FDI in*

*Retail—II: Inviting more Trouble?* Centre for Policy Alternatives, New Delhi, Feb 2006, http://cpasindia.org

[48] T. K. Rajalakshmi, "Sustained resistance", *Frontline*, Dec. 17-30, 2011, http://www.frontlineonnet.com

[49] Henry Blodget, "Walmart Employs 1% Of America. Should It Be Forced To Pay Its Employees More?" *Business Insider*, Sept 20, 2010, http://articles.businessinsider.com

[50] Dave Jamieson, "Walmart Minimum Wage Of $12 Wouldn't Drive Up Prices, Says Study", *Huff Post*, April 19, 2011, http://www.huffingtonpost.com; Rachel Johnson, "California Walmart Workers Win Settlement Over Wage Violations", May 13, 2010, http://www.californiaprogressreport.com

[51] Stephen Lendman, "Global Sweatshop Wage Slavery", Feb 25, 2010, http://www.thepeoplesvoice.org

[52] Jonathan Turley, "Walmart CEO Makes Average Workers Annual Salary Every Hour", July 3, 2010, http://jonathanturley.org

[53] P. Sainath, "FDI in retail—UPA 'retired hurt'", *The Hindu*, Dec 12, 2011, http://www.thehindu.com

[54] Devinder Sharma, "FDI in retail: Whom are you kidding, Mr PM?" Nov 30, 2011, http://www.rediff.com

[55] Shekhar Swamy, "How FDI in retail will hurt farmers", *The Hindu Business Line*, Dec 25, 2011, http://www.thehindubusinessline.com

[56] *Power Hungry: Six reasons to regulate global food corporations*, Actionaid International, Jan 2005, www.actionaid.org.uk

[57] Jayati Ghosh, "Multinational Retail Firms in India", *Macroscan*, Dec 12, 2011, http://www.macroscan.org

[58] Mohan Guruswamy, Kamal Sharma, *FDI in Retail—II: Inviting more Trouble?* op. cit.

[59] *Power Hungry: Six reasons to regulate global food corporations*, op. cit.

[60] *Aspects of India's Economy*, No. 43, Research Unit for Political Economy, July 2007, http://rupe-india.org

[61] "Power Hungry: Six reasons to regulate global food corporations", Actionaid International, Jan 2005, www.actionaid.org.uk

[62] Ibid.

[63] Nivedita Menon, "Indian Government's Claims About Corporate Retail and the Reality: Shankar Gopalakrishnan", Kafila, November 30, 2011, http://kafila.org/2011

[64] Shekhar Swamy, "How FDI in retail will hurt farmers", The Hindu Business Line, Dec 25, 2011, http://www.thehindubusinessline.com

[65] Aspects of India's Economy, No. 43, Research Unit for Political Economy, July 2007, http://rupe-india.org

[66] "Power Hungry: Six reasons to regulate global food corporations", Actionaid International, Jan 2005, www.actionaid.org.uk

[67] "States to adopt news laws for contract farming", Economic Times, August 31, 2005, taken from IBEF, http://www.ibef.org; on how Centre and World Bank are armtwisting unwilling state governments, see: Gautam Dheer, "Deadline draws near Punjab still to amend APMC Act", Express India, Mar 03, 2008, http://www.expressindia.com

[68] For more discussion on this, see: Neeraj Jain, India Becoming a Colony Again, pp.



33-38, Lokayat publication, Pune, available online at www.lokayat.org.; Neeraj Jain, Globalisation or Recolonisation, Lokayat publication, Pune; available online at www.lokayat.org.in

[69] P. Sainath, "FDI in retail—UPA 'retired hurt'", The Hindu, Dec 12, 2011, http://www.thehindu.com

[70]"Wal-Mart's Impact on India's Suppliers—No FDI in India", http://www.indiafdiwatch.org; "Criticism of Walmart", Wikipedia, sourced on Jan 28, 2012, http://en.wikipedia.org

[71] "Power Hungry: Six reasons to regulate global food corporations", Actionaid International, Jan 2005, www.actionaid.org.uk

[72] "Boycott Walmart", http://www.1worldcommunication.org

[73] Aspects of India's Economy, No. 43, Research Unit for Political Economy, July 2007, http://rupe-india.org

[74] There are numerous articles on working conditions in Walmart's China suppliers available on the internet. See for example: David Barboza, "In Chinese Factories, Lost Fingers and Low Pay", The New York Times, Jan 5, 2008, http://www.nytimes.com; Peter S. Goodman and Philip P. Pan, "Chinese Workers Pay for Wal-Mart's Low Prices", The Washington Post, Feb 8, 2004, http://www.washingtonpost.com

[75] Nivedita Menon, "Indian Government's Claims About Corporate Retail and the Reality: Shankar Gopalakrishnan", Kafila, November 30, 2011, http://kafila.org/2011

[76] C. P. Chandrasekhar, "Experience so far", Frontline, Dec. 17-30, 2011, http://www.frontlineonnet.com

[77] "Power Hungry: Six reasons to regulate global food corporations", Actionaid International, Jan 2005, www.actionaid.org.uk

[78] Nivedita Menon, "Indian Government's Claims About Corporate Retail and the Reality: Shankar Gopalakrishnan", Kafila, November 30, 2011, http://kafila.org/2011

[79] "Power Hungry: Six reasons to regulate global food corporations", Actionaid International, Jan 2005, www.actionaid.org.uk

[80] "Balance of Payments: Current account deficit surges to 4.2% of GDP in FY2012", June 30, 2012, http://www.derivatives.capitaline.com; "India's current account deficit widens", PTI, Jun 29, 2012, http://timesofindia.indiatimes.com; "Mecklai graph: India's external debt at USD 345 bn, up 13%", Sep 11, 2012, http://www.moneycontrol.com

# आमच्याबद्दल : लोकायत




*कौन आज़ाद हुआ?*

*किसके माथे से गुलामी की सियाही छूटी?*

*मेरे सीने में अभी दर्द है महकूमी का...*

*मादरे-हिन्द के चेहरे पे उदासी है वही....*

*कौन आज़ाद हुआ?*

स्वातंत्र्यानंतर काही वर्षातच अली सरदार जाफरींनी ही कविता लिहीली. पण ह्या ओळी देशाच्या आजच्या परिस्थितीचेही अधिक तंतोतंत वर्णन करतात. कोण स्वतंत्र झालं हा खरा प्रश्नच आहे. हा देश आता फक्त धनिकांचा झाला आहे आणि विकासही फक्त त्यांचाच होत आहे. एकीकडे हे मोठमोठे मॉल्स, अत्याधुनिक गाड्या, एक्सप्रेस हायवेज, जगभरातून आयात होत असलेल्या अय्याशीच्या वस्तू, पंचतारांकित हॉस्पिटल्स... तर दुसरीकडे बहुतांश जनतेला स्वातंत्र्यानंतर जो भाकरतुकडा मिळत होता, तो सुद्धा आता काढून घेतला जात आहे.

गेली दोन दशके जागतिकीकरणाच्या नावाखाली महाकाय बहुराष्ट्रीय कंपन्यांना या देशात आमंत्रित केलं जात आहे. देश आज फक्त बड्या देशी-परदेशी उद्योगपतींच्या नग्न नफेखोरीसाठीच चालवला जातोय. ते प्रचंड नफ्याच्या हावेपोटी गरिबांची जंगले, जमिनी, पाणी ह्यांवर हिंस्त्रपणे हल्ले करत आहेत. पोलिस-न्यायालय-राजकारणी-नोकरशहा यांच्या उघडउघड सहकार्याने गरिबांच्या जीवनसाधनांवर ताबा मिळवून त्या ठिकाणी खाण प्रकल्प, विशेष आर्थिक क्षेत्राचे प्रकल्प, आलिशान गृह प्रकल्प, इ.इ. उभे करत आहेत. यासाठी आपल्या देशातील कायदेकानूनही बदलले जात आहेत. खाजगीकरणाच्या नावाखाली जनतेच्या श्रमांनी आणि पैशांनी उभे केलेले सार्वजनिक उद्योग आणि बॅंका व विमा कंपन्या कवडीमोल किंमतीत त्यांना सोपवल्या जात आहेत. शेतीव्यवस्थाही त्यांच्या ताब्यात देण्यासाठी धोरणे बदलली जात आहेत. परिणामी लाखो शेतकरी आत्महत्या करत आहेत, देशातील ६०% जनता ग्रामीण भागातून शहरातील बकाल वस्त्यांमध्ये ढकलली जात आहे. छोटे उद्योग नागवले जात आहेत. शिक्षण, आरोग्य, वाहतूक व्यवस्था, वीज, पाणी, ह्यांसारख्या अत्यावश्यक सेवा सुद्धा नफा आणि फक्त नफा कमावण्याचं साधन बनवल्या जात आहेत. आपण काय खावं, प्यावं, ल्यावं, चिंतावं, पहावं, हे ठरवण्याची मक्तेदारीच जणू बहुराष्ट्रीय कंपन्यांनी घेतली आहे. म्हणून त्यांच्या भांडवलाबरोबर त्यांची संस्कृतीही त्यांनी आपल्याकडे रुजवली आहे. **आता आपल्या देशावर कुणी थेट शासन करण्याची गरज नाही. आर्थिक नाड्या आपल्या हातात ठेवून त्यांनी परत एकदा नवी गुलामी आणली आहे.**

जीवनावश्यक वस्तूंची प्रचंड वाढती महागाई, जागोजागी बोकाळलेला भ्रष्टाचार, खोटेपणा, कॉलेजची आकाशाला भिडलेली फी आणि नोकरीची आशा शून्य. शिवाय आपणच नालायक आहोत असं वाटायला लावणारी शिक्षणव्यवस्था आणि परीक्षा पद्धती, नोकरीचं खापर राखीव जागांवर फोडणारी जात जमातवादी समाजव्यवस्था आणि देवाधर्माच्या नावाखाली माणसाला माणसापासून वेगळं पाडणारं धर्मांध राजकारण, माणसांच्या आजाराचा होत असलेला व्यापार... हे आजचं वास्तव आहे.

अर्थात सर्वसामान्य जनता विदेशी कंपन्यांचे व येथील धनदांडग्यांचे हे खेळ मूकपणे बघत बसलेली नाही. वसंतात जसं प्रत्येक कानाकोपऱ्यात फुलं फुलायला लागतात, तसंच देशभरात निरनिराळ्या ठिकाणी लोकांनी एकत्र यायला, संघटित व्हायला, आणि आपले संघर्ष बुलंद करायला सुरुवात केली आहे. आत्ता जरी हे संघर्ष छोटे असले, तुटक असले, तरी भविष्य या छोट्या छोट्या संघर्षातच दडलेलं आहे. ते जेव्हा मजबूत होतील, एकत्र येतील आणि आणखी लोक या लढ्यात सामील होतील तेव्हा ते एक मोठी ताकद बनतील.

आपण बघ्याची भूमिका सोडली पाहिजे, चांगल्या भविष्याची स्वप्न पाहिली पाहिजेत, जग बदलु शकतं ह्यावर विश्वास ठेवला पाहिजे. हो ! दुसरं जग शक्य आहे. पण त्यासाठी आपलेही छोटे-छोटे लढे सुरु केले पाहिजेत. हिमालयातल्या छोट्या छोट्या नद्यांचे प्रवाह एकत्र येऊन त्यांची गंगा बनते, तसंच हे लढेही एकत्र येतील. म्हणूनच हे व्यासपीठ.

भारतातील वैदिक काळापासूनचा विचार म्हणजे लोकायत. लोकायत ही दैववाद झुगारणारी वास्तववादी, विवेकवादी जीवनदृष्टी आहे. जीवन सम्यक रितीने जगण्याचा हा विचार आहे. समस्या मानवनिर्मित आहेत, त्यापासून पळून न जाता त्यांना सामोरे गेले पाहिजे, ही प्रेरणा लोकायती विचार आम्हाला देतात. ही परंपरा आम्ही स्वीकारतो. म्हणूनच या व्यासपीठाचे नाव लोकायत. ज्यांना हे जग बदलण्यासाठी आपणही काही करावं असं वाटतं त्यांच्या सहकार्याने आम्ही विविध कार्यक्रम राबवतो.

- शिक्षण-वीज-आरोग्यसेवा ह्यांचे बाजारीकरण, शहरातील सार्वजनिक वाहतूक समस्या, अणुऊर्जेची घातकता, बी.टी. वांग्यासारख्या जनुकीय बदल असलेल्या अन्नांचे दुष्परिणाम, जीवनावश्यक वस्तूंची वाढती महागाई, यांसारख्या लोकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर व्यापक जनजागृती करून लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न करतो. त्याशिवाय 'पेप्सी कोक भारत छोडो', 'अजून भोपाळ नकोत', 'न्यायव्यवस्थेचे उत्तरदायित्व आणि सुधारणा' यांसारख्या राष्ट्रीय अभियानांमध्येही आमचा सक्रिय सहभाग आहे. त्यासाठी या प्रश्नांवर आधारित पथनाट्य, पोस्टर प्रदर्शन, गाणी अशा कला प्रकारांचा